

# पोस्टमनच्या मृत्यूचा रहस्यभेद

धनंजय कलमष्टे

# पोस्टमनच्या मृत्यूचा रहस्यभेद

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# पोस्टमनच्या मृत्यूचा रहस्यभेद

लेखक

धनंजय कलमष्टे

# पोस्टमनच्या मृत्यूचा रहस्यभेद

## लेखक... धनंजय कलमष्टे

फोन नंबर - 8856829069

ईमेल - dhananjaykalmaste05@gmail.com

Wordpress- http://creative225248853.wordpress.com

Utube channel link-https://youtu.be/BqpisXOGFTQ

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : ७ सप्टेंबर २०२०**



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# मनोगत

नमस्कार वाचक मित्र आणि मैत्रिणी

मी धनंजय कलमष्टे,

चौथीमध्ये असताना मी पहिले पुस्तक सती अनुसया वाचले. मध्यंतरी कित्येक पुस्तके वाचली. नंतर अभियांत्रिकीला असताना संभाजीराजे व मृत्युंजय माझ्या वाचनात आले. ही पुस्तके वाचल्यानंतर वाचनाचा जणू विडाच उचलला गेला. वाचनाची ती तहान अजून तरी थांबलेली नाही व थांबणार नाही. नंतर जवळ जवळ 95 पुस्तके वाचली गेली. नंतरसुद्धा ईसाहित्य वर पुस्तक वाचू लागलो एके दिवशी समजले कि आपल्यालासुद्धा पुस्तक पब्लिश करता येईल... हळू हळू स्वतः काहीतरी लिहाव असं वाटायला लागलं. Esahitya वरील काही लेखकाना त्यांची पुस्तके वाचून अभिप्राय पण कळवला. माझे पहिले पुस्तक 'लग्नाआधीची गोष्ट' वाचून बऱ्याच वाचक मित्रांनी आपापला प्रतिसाद कळवला. त्यानंतर काहीतरी नवीन लिहिण्याच्या मी शोधत

असतानाच मला ही कथा सुचली. वाचकांना ही कथा आवडेल अशी आशा आहे. तसेच पुस्तक लिहिताना, अंजनी, मंजुषा यांची सुद्धा मदत झाली.. ज्वलनशील पदार्थाला एक ठिणगी हवी असते तेव्हा त्याचा स्फोट होतो. तसे प्रत्येकाने आपापल्या परीने ठिणगी देण्याचे काम केले आहे. त्याबद्दल त्यांचे सगळ्यांचे मनापासून आभार.

धनंजय कलमष्टे

या कथेमधील सर्व स्थळे, नावे, पात्र व घटना काल्पनिक आहेत.

त्यांचा वास्तवाशी कोणताही संबंध नाही.

साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# अर्पणपत्रिका

हे पुस्तक पोलीस खात्यातील अहोरात्र

मेहनत करून आपले रक्षण करणाऱ्या

पोलिसांना अर्पण करत आहे.

तसेच मला लिहिण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या

प्रत्येक व्यक्तीस माझे हे पुस्तक

मी अर्पण करत आहे.

**धनंजय कलमष्टे, पुणे**



आयुष्य हा एक प्रवास आहे. आणि हा प्रवास एकट्याने करायचा म्हणजे थोडं अवघडच आहे. पण समजा एखाद्याला जर कोणाची साथ भेटली आणि ती भेटलेली साथ जर कायम आपल्या बरोबर राहणार असेल तर? मला ही अशीच एक साथ भेटली पुस्तकांची... मी चवथीत असताना सुट्टीला मुंबईला मावशीकडे गेलो होतो तेव्हा मी सती अनुसया हे पुस्तक वाचले. आता तुमच्यातले काही जण म्हणतील शाळेत काय वाचत होतास मग? तुमचा प्रश्न बरोबर आहे. मला असे म्हणायचे होते कि अभ्यासाव्यतिरिक्त पाहिले पुस्तक मी वाचले. एवढ्या छोट्या वयामध्ये मला ते समजले सुद्धा. अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षाला असेल मला एका मित्राने संभाजी राजे हे पुस्तक वाच म्हणून सांगितले. पुस्तक वाचून अंगावर काटा आला. दिवसाला 70 ते 80 पाने असं माझं

वाचन होतं. ते थोड्याच दिवसात संपवले.. आता असंच काहीतरी रक्त उसळत राहावे अशा पुस्तकाच्या शोधात असताना मृत्युंजय माझ्या हाती पडलं.

मी कोणत्याही भाषेला कमी जास्त मानत नाही पण मराठी माझी मातृभाषा असल्याने अर्थातच माझी ओढ त्याकडे जास्त आहे. भाषा ही आई सारखी असते असं मला वाटतं. मान आपण सगळ्यांचा देतो पण सगळ्यात छान म्हंटलं कि त्यात वादाचा प्रश्न येतो कुठे? - आपलीच आवडणार.

नंतरसुद्धा मी हिंदी, इंग्लिश यांसारखी पुस्तके वाचू लागलो. भाषा बदलल्याने भावना बदलत नाहीत असं माझं ठाम मत आहे. ययाती पुस्तक हातात पडले तर पायाखालची जमीन सरकते कि काय असे वाटू लागले.. त्या राजाला असा एक क्षण आला होता कि त्याला आपली बहीण व बायको यांच्या मधला फरक कळू नये. हे फक्त बोलायचं म्हणून नाही, खोटं वाटत असेल तर वाचून बघा. माणसाला स्वतःत बदल घडवायचा असेल तर एकच मनुष्य माझ्या मते प्रथम क्रमांकावर असू शकतो. ते म्हणजे आपले दैवत छत्रपती शिवाजीराजे भोसले त्याच्या बद्दलची सर्वच पुस्तके जमत नसेल तर

श्रीमानयोगी वाचा. यामध्ये अजून एक पुस्तक कसे मागे राहील ते म्हणजे श्यामची आई. माणसाला जर वेगवेगळ्या लाइफ जगायच्या असल्या तर बायोग्राफी वाचून बघा. नेपोलियन, हिटलर, सुभाषचंद्र बोस, सिकंदर, यांसारखी गरूड झेप घेणारी प्रतिभावंत लोक होऊन गेले त्यांची चरित्र एकदा वाचून तर बघा. आणि जर तुम्हाला लेखन, वाचन खूपच आवडत असेल तर मी एका लेखकाचे नाव सुचवतो नक्की वाचून बघा, तो म्हणजे डैन ब्राउन. उत्कृष्ट लेखनशैली असलेले हे एक लेखक. मी वाचलेल्या पैकी द दा विंची कोड व डिसेप्शन पॉईंट. त्यानंतर मी चेतन भगत यांची ही पाच पुस्तके वाचली आहेत. मला त्यांची विचार करण्याची पद्धत खूप आवडते. आणि ज्या प्रकारे ते वेगवेगळ्या विषयांवर लिखाण करतात ती गोष्ट मला जास्त आवडते. आता हिंदी पुस्तकांबाबत बोलायचं झालं तर आमिष त्रिपाठी यांची पुस्तके तुम्ही जरूर वाचून पहा. आपण या सर्व गोष्टी मधून किती घेतो हे महत्वाचे नाही का?. पुस्तक वाचनाचे वेड लागायचे एकच कारण आहे?... ऐकायचं आहे तर मग ऐका. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे जेव्हा निधन झाले तेव्हा त्यांच्या घरात 2500 पुस्तक भेटली पण अंगावरचे सूट फक्त 2 का 3!... आता आपण विचार करू तो माणूस कोणत्या

पदाला होता.. नसता जमवू शकला का अजून कपडे किंवा बाकीच्या गोष्टी. मग आपण का खटाटोप करत आहोत इतका? आता ही गोष्ट मी टीव्हीला बघितली की वाचली एवढं आठवत नाही पण काय फरक पडतो ती खरी असली काय किंवा खोटी मी तरी इनस्पायर झालो त्यामुळे... तेव्हाच निश्चय केला मी ही एवढी पुस्तक वाचणार, आता कुठे 95 झालेत पण होतील लवकरच...

आता लॉकडाऊन चालू आहे. समजा तुम्हाला कोरनटाईन म्हणून कोणत्या तरी ठिकाणी पाठवले. आणि जेवण पुरवले जाणार असेल खाण्याचा सर्व पुरवठा देण्यात येणार असेल तर तुम्ही काय सोबत घ्याल. मी तर माझ्यासाठी पुस्तके घेईल. यावरून आठवले- माझी जन्मठेप वाचायला हरकत नाही..

**धनंजय कलमष्टे, पुणे**


YOUR JOB GIVES YOU
AUTHORITY
YOUR BEHAVIOR GIVES YOU
RESPECT
SPREADSHIRT

## भाग -1

सकाळची सुमारे दहाची वेळ होती. इंस्पेक्टर शिंदे आज थोडं उशिराच आले होते. 1993 चा मुंबई बॉम्ब ब्लास्ट झाल्यापासून वेळी-अवेळी होणारे गुन्हे व ते गुन्हे करणारे गुन्हेगार यांमुळे पूर्ण पोलिस स्टेशनमध्ये नुसती धावपळ असायची. त्यात जातीजातीमध्ये होणाऱ्या दंगली व मारामाऱ्या यामुळे पोलिस स्टेशनसुद्धा गच्च भरलेले असायचं. पोलिस स्टेशन चोवीस तास उघड असून सुद्धा दररोज तेवढीच गर्दी असायची. दोन दिवसापासून खुनाची किंवा बलात्कार या प्रकरणी एकही केस आलेली नसल्याने शिंदे मनातल्या मनात थोडे खुश होते. शेवटी खूनखराबा म्हणजे वरून येणारे प्रेशर व होणारी धावपळ यांमुळे सगळे वैतागले होते.

इंस्पेक्टर शिंदे तसे दिसायला रुबाबदार, भरदार नाक, भेदक नजर, उंच अंगकाठी, एखाद्या पोलिसांना शोभेल अशी

मिशी आणि तुळतुळीत दाढी केलेला पांढरा चेहरा, वय जवळपास पस्तीस वर्ष ...

आपल्या खुर्चीमध्ये बसून न सुटलेल्या काही केसेसचा विचार करत ते बसले असताना बाजूला टेबलावर ठेवलेला काळया रंगाच्या लॅण्डलाईन फोनवर अचानक रिंग बाजू लागली. ट्रिंग ट्रिंग... ट्रिंग ट्रिंग...

फोनची रिंग वाजणे म्हणजे एक प्रकारचे निमंत्रण असायचं. हा आता हे निमंत्रण काही जेवणाचे किंवा एखाद्या चांगल्या गोष्टीचे नव्हतं… ते असायचं एका नवीन आरोपाचा पर्दाफाश करायचं किंवा नवीन मोहिमेचं... कधी कधी जीव गमवावा लागत असे… पण सद्रक्षणाय खलनिग्रहणाय हे ब्रीद वाक्य मनाशी बाळगून आजपर्यंत पोलिस काम करत आले होते... सद्रक्षणाय खलनिग्रहणाय म्हणजेच चांगल्या लोकांना वाचवणे व दुष्टांचा नाश करणे होय.

इंस्पेक्टर शिंदेंनी फाईलमध्ये बघत बघत फोन उचलून कानाला लावला.’’सहारा पोलिस स्टेशन का?" पलीकडून कोणीतरी विचारलं...

इंस्पेक्टर शिंदे फोनवर म्हणाले, "हो हो सहारा पोलिस स्टेशन, सहारा रोड, अंधेरी पूर्व.”

इंस्पेक्टर शिंदे पुढे म्हणाले, "कोण बोलतंय, बोला काही प्रोब्लेम आहे का?"

फोनवरून पलीकडून आवाज आला, "साहेब खून झालाय सहारा विमानतळावर, लवकर या साहेब” इंस्पेक्टर शिंदेंनी हवालदार बोबडे यांना पत्ता व काही माहिती नीट लिहून घेण्यास सांगितली..

खुनाचा एखादी केस आली कि पोलिस स्टेशनमध्ये वातावरण कसे बिघडते हे सगळ्याना ठावूक होतं. एरवी शांत असणारे शिंदेसाहेब सुद्धा कामाचा व्याप वाढायला लागला कि चिडचिड करायला लागत. इंस्पेक्टर शिंदेंनी घड्याळात टाइम बघितला तेव्हा 10 वाजून 10 मिनिटे झाली होती. शिंदेंनी दुसऱ्या एका हवालदाराला गाडी काढायला लावली. पोलिसस्टेशनमध्ये काही सूचना शिंदे देऊन हवालदार बोबडे व हवालदार काळे तिघे पोलिस स्टेशनच्या बाहेर पडले.

मारुती सुझुकी जिप्सी घेऊन हवालदार नाईक दोन मिनिटांच्या आत गेट बाहेर गाडी घेऊन उभे राहिले. याआधी वेळेवर काम केले नाही कि साहेब कसे रागावतात हे सगळ्याना लक्ष्यात होतं. आपली गांधी टोपीसारखी दिसणारी पण खाकी टोपी नीट करत नाईकांनी गाडीची चावी फिरवून गाडी सुरू करून पहिला गियर टाकला. इंस्पेक्टर शिंदे नाईकांच्या बाजूला बसलेले होते. बाकीचे दोघे मागच्या बाजूला बसलेले होते.

गाडी छत्रपती शिवाजी महाराज इंटरनॅशनल विमानतळाच्या दिशेने निघाली. मागच्या जवळजवळ एक वर्षापूर्वीच सहारा विमानतळाचे नाव छत्रपती शिवाजी महाराज इंटरनॅशनल विमानतळ करण्यात आले होतं. मोजकंच अंतर म्हणायचं दहा मिनिटांमध्ये गाडी विमानतळावर पोहोचली. पोलिसांची गाडी खून झालेल्या जागेच्या दिशेने वळली.

गाडीमधून खाली उतरताच इंस्पेक्टर शिंदेंनी आक्रमक पावित्रा घेतला. व मोठ्या आवाजात अधिकाऱ्यांना ओरडले, ”काय झालंय?” तिथलाच एक मोठा अधिकारी घाबरत घाबरत जवळ आला व म्हणाला,” साहेब, खून झालाय.”

इंस्पेक्टर शिंदे परत थोडं दमदाटीच्या आवाजात म्हणाले, "त्यासाठीच आलोय. मला थोडं जास्त समजलं तर बरं होईल." लोकांवर जरब बसवण्यासाठी शिंदेंना मुद्दामून असं मोठ्या आवाजात कधीकधी बोलावं लागत असे..

तो अधिकारी म्हणाला कि, "साहेब माझं नाव हेमंत, मी इथेच मोठ्या पदावर कामाला आहे."

शिंदे गर्दीच्या दिशेने जात जात म्हणाले," सगळ्यात आधी मृतदेहाला कोणी बघितलं, व किती वाजता लक्ष्यात आलं? "

तो अधिकारी खिशातून रुमाल काढून घाम पुसत पुसत म्हणाला, "साहेब आमचा कामगार आहे, 'मंगेश'.. तो दररोज साफसफाई करायला येतो, आज सुद्धा तो कामाला आला पण आज त्याला यायला उशीर झाला. आल्यानंतर मला भेटून इकडे आला तर त्याला हा माणूस अशा अवस्थेत दिसला."

शिंदेंनी परत एक प्रश्न विचारला," बरं आणि खून झालेल्या माणसाबद्दल काही माहीत आहे का?"

अधिकारी गर्दीच्या दिशेने जात जात म्हणाला," साहेब तो पोस्टमन आहे!"

शिंदेंनी चकित होऊन विचारलं," पोस्टमन? त्याला कशाला कोण मारेल?" तेवढय़ात पुढे जमा झालेले पत्रकार इन्स्पेक्टर शिंदेंच्याकडे बघायला लागले. शिंदे मनातल्या मनात विचार करू लागले," यांना बरं सगळे लवकर समजतं. या पत्रकारांना लगेच गुन्हेगार हवा असतो. यांना काय माहीत एका गुन्ह्याचा शोध घ्यायला काय काय करावं लागतं."

इन्स्पेक्टर शिंदे जवळ येताच पत्रकारांनी आपला मोर्चा त्यांच्याकडे वळवला. व निरनिराळे प्रश्न विचारू लागले. शिंदेंनी हात करून सगळ्याला शांत केले व सांगितले," मला आधी बघू तरी द्या, मग बोलुया".. तिघा हवालदारांनी शिंदेंना पुढे जाण्यासाठी जागा करून दिली. शिंदे मृतदेहाजवळ आले...

इन्स्पेक्टर शिंदेंना खाकी पोषाख घातलेला एक माणूस जमिनीवर पडलेला दिसला. बाजूला थोड्या अंतरावर एक अटलास कंपनीची सायकल पडलेली होती. सायकलचे पुढचे चाक मधून वाकलेले होतं, असं वाटत होतं चाकावर कोणीतरी दगड किंवा कोणत्यातरी वस्तूने आघात केलेला आहे. सायकलपासून जेमतेम एक हात अंतरावर एक कापडी पिशवी पडलेली होती. पिशवीमधून पत्रे बाहेर येऊन पडलेली होती. काही पत्रांचे बाहेरचे पाकिटे फाटून आतल्या चिठ्या व काही

सामान बाहेर आलेले दिसत होतं.. थोड्याच अंतरावर एक पैशाचे पाकीट पडलेले होतं त्यातून पैसे गायब होते. पैशावरून हा खून झाला असावा हे लक्ष्यात यायला शिंद्यांना जास्त वेळ लागला नाही.

## भाग -2

सायकलची व पत्रांची ती अवस्था बघून शिंदे परत एकदा मृतदेहाकडे वळले. शिंदेंनी मृतदेहाची तपासणी सुरू केली. समोरच्या व्यक्तीला दोन भुवयाच्यामध्ये गोळी लागली होती हे सहज सहज दिसत होतं. एवढ्यात हवालदार नाईक हाताच्या बोटांनी काहीतरी दाखवण्याचा प्रयत्न करताना सगळ्यांना दिसले. त्या मृतदेहाच्या पायाखालून सुद्धा रक्त पडलेले दिसल्यामुळे त्यांनी जवळून बघितल्यामुळे त्यांच्या लक्ष्यात आलं की दोन्ही पायांना सुद्धा दोन गोळ्या लागलेल्या आहेत. कदाचित हा पोस्टमन पळू नये म्हणून आधी पायावर गोळी मारली असावी व नंतर डोक्यात..

शिंदेंनी हवालदारांना आजूबाजूला अजून कुठे गोळ्या झाडल्या गेल्या आहेत का? हे बघायला सांगितलं.

समोरच्च्या माणसाच्या खाकी शर्टवर असलेल्या नावामुळे शिंदेंना त्याच नाव शोधायला जास्त वेळ लागला नाही. पण त्या नावाच्च्या पट्टीवर रक्त पडल्यामुळे नाव नीट दिसत नव्हतं. हवालदार बोबडेंनी एका कपड्यांनी ते साफ केलं तेव्हा त्यांच्च्या नजरेस त्याचे नाव पडले ‘चंदू माने’.

मृतदेह फोरेन्सिकला पाठविण्यासाठी हवालदाराने फोन केला. गाडी थोड्याच वेळात पोहोचणार असल्याने शिंदेंनी मंगेशकडे आपला मोर्चा वळवला. हा मंगेश तोच युवक होता ज्याने सर्वात आधी मृतदेह पहिला होता.

“बरं  तूच अगोदर याला पाहिलास ना?”

“हो साहेब “

“बरं  आणि आजच तुला यायला नेमकं उशीर झाला असं मला तुझ्या मॅनेजरनी सांगितलं, उशिरा येण्याचे कारण काय?”

“सर मी कालच साहेबांना सांगितलं होत आज उशीर होईल.”

इन्स्पेक्टरांनी मंगेशला प्रश्न विचारायला सुरुवात करताच त्याचा थरकाप उडाला. आपण पाच वर्ष झाले इथे

सफाईचं काम करत असल्याचे त्याने सांगितलं. आणि मी काही केलं नाही हा पाढा तर त्याने प्रत्येक वाक्यानंतर चालूच ठेवला होता …

दररोजसारखं आपण इकडे साफसफाई करायला आलो तर हा इथे पडलेला दिसला असं त्याने सांगितलं. त्यानंतर आपण लगेच हेमंत सरांना व इतर लोकांना सांगितलं हे त्याने सांगितलं.

कदाचित पहाटे पहाटे कोणीतरी याला मारलं असावं असा विचार शिंदेंच्या मनात येऊ लागला. शिंदे त्या अधिकाऱ्याकडे गेले व म्हणाले, "हे इतकं मोठं विमानतळ, तुम्ही इकडे लक्ष ठेवता का नाही?"

अधिकारी म्हणाला, "साहेब लक्ष तर असतं... सगळीकडे बंदोबस्त कडक आहे, कॅमेरे पण आहेत पण"... पण हा शब्द जेव्हा जेव्हा मध्ये येतो तेव्हा काम अर्धवट असतं हे शिंदेंना माहीत होतं. गेल्या दहा वर्षांच्या नोकरीमध्ये त्यांनी कितीतरी ‘पण’ ऐकले होते...

शिंदे रागाने म्हणाले, " पण, पण काय?"

अधिकारी सांगू लागला," साहेब ज्या ठिकाणी गर्दी आहे तिकडे कॅमेरे असतात ही बाजू सहसा निर्मनुष्य असते

म्हणून इकडे कॅमेरे नाहीत. पण थोड्या अंतरावर आहे कॅमेरा पण या बाजूचे त्यात काही दिसणार नाही.”

शिंदेंनी परत त्या मृतदेहाकडे बघत प्रश्न केला, "आणि हा कधी पासून हा इकडे कामाला आहे?"

अधिकारी सांगू लागला," साहेब आपल्याकडे एक रजिस्टर आहे त्यात या सगळया विषयी सविस्तर माहिती भेटेल.”

रजिस्टरमध्ये बघत बघत त्या अधिकाऱ्यांनी माहिती वाचायला सुरुवात केली, "नाव चंदू माने, वय 30 वर्ष, भरती होण्याची तारीख, घरचा पत्ता, आणि जि पी ओचा पत्ता...

जाता जाता शिंदेंनी त्या अधिकाऱ्याला जिथे खुन झाला होता त्या ठिकाणी कॅमेरा बसवून घेण्याची व काही वेगळे आढळून आल्यास त्वरित संपर्क साधण्याचे बजावून सांगितलं.

इंस्पेक्टर शिंदेंनी गाडी काढून जि पी ओच्या दिशेने घ्यायला सांगितली.

जि पी ओ म्हणजे जनरल पोस्ट ऑफिस होय. येथे आतील व बाहेरील सर्व मेल व पार्सल आणले जातात व नंतर

लहान मोठ्या पोस्ट ऑफिसला पाठवले जातात. मारुती सुझुकी जि पी ओच्या समोर येऊन थांबली. जि पी ओच्या आतमध्ये गेल्यानंतर शिंदेंनी आतमधे सगळया कामगारांना एका बाजूला उभा केले. सकाळी सकाळी पोलिसांचं दर्शन करणे हे साहजिकच कोणाला आवडत नाही त्यामुळे सगळंया पोस्टमन व इतर कामगार लोकांचा चेहरा पडलेला होता. त्यात याआधी कधी असला प्रसंग कधी कोणावर ओढवला नव्हता. आता पुढे काय वाढून ठेवले आहे याची सर्वजण प्रतीक्षा करत होते.

इंस्पेक्टर शिंदेंनी जास्त लपवा छपवी न करता सरळ सरळ सगळयाना चंदू मानेचा खून झाल्याचं सांगितलं. सकाळ सकाळ असली वार्ता ऐकुन सगळयाना घामच फुटला. इंस्पेक्टर आता प्रत्येकाची चौकशी करणार आहेत असं कोणीतरी हळूच म्हणाले तसं सगळयांना भिती वाटायला लागली. सगळयांची चौकशी झाल्यानंतर पोलिसांच्या हे लक्ष्यात आलं चंदू हा कामावर आला तरी सारखं चिंतेत असायचा कारण त्याचं कायम त्याच्या घरच्यासंगे वाद चालू असायचे. खास करून त्याच्या बायकोबरोबर...

वादाचं नेमकं कारण कोणी सांगितलं नाही. एरवी लोकांच्या भानगडीमध्ये लोकांना डोकं घालायला आवडतं पण अशा वेळी लोक शहाणपण दाखवतात हेच खरं... आता इथे यापेक्षा अजून काही मिळणार नाही हे पोलिसांना कळून चुकले, पण तरीही गरज लागली तर पुन्हा येईल असं सांगून पोलिस तेथून बाहेर पडले.

चंदूच्या घरचा पत्ता अगोदरच हवालदार काळेंनी एका डायरीमध्ये टिपून घेतला होता. पत्ता ऐकुन गाडी त्या दिशेने वळली. गोरेगावच्या भागात पोलिसांची गाडी थांबली. एका पान टपरीवर चंदूच्या घरचा पत्ता विचारून गाडी त्यांच्या घरासमोर थांबली.

पोलिसांची गाडी व पोलिस बघून आजूबाजूच्या लोकांची तारांबळ उडाली.

## भाग -3

घराची जेमतेम स्थिती बरीच होती म्हणायची, एखाद्या पोस्टमनच्या पगाराला शोभेल अशी... पोलिसांनी गंज लागलेल्या लोखंडी कडीला हात लावून कडी वाजवली. तेवढ्यात चंदूच्या घरचा दरवाजा उघडला गेला, वयाने 55 ते 60 वर्षांने असलेल्या एका व्यक्तीने दरवाजा उघडला. अंगात साध फाटक बनियन व खाली निळ्या कलरची लुंगी, सावळा रंग व तोंडावर सुरकुत्या, कदाचित एका डोळ्याने कमी दिसत असावे, एकूण दिसण्यावरून हा व्यक्ति चंदूचे वडील असावेत असा शिंदेंनी अंदाज लावला...

दारात पोलीस आलेले बघून घरातले घाबरले. पोलिसांनी आत जाऊन घडलेला वृतांत घरच्यांच्या कानांवर घातला. हे ऐकताच एका बाईने जोराने रडायला सुरुवात केली. काळा सावळा रंग, अंगाने शिडशिडीत अशी ती स्त्री होती. दिसण्यावरून तर चंदूची बायको असावी असे शिंदेंना वाटले, कारण घरात दुसरी कोणी स्त्री नव्हती पण भिंतीवरील फोटोमध्ये

एका स्त्रीचा चेहरा बघून ही त्याची आई असावी हा अंदाज येत होता.

दुसऱ्या बाजूला भिंतीवर कित्येक देवांचे फोटो लावलेले होते आणि त्यावर गंध लावल्याने कोणता देव कोठे आहे हे ओळखता येत नव्हतं. भिंतीवर गणपती व मारुती तेवढा त्यांच्या अंगावरून काय तो ओळखता येत होता. भिंतीना निळा रंग असला तरी पोपडे निघाल्यामुळे आतमधील गुलाबी रंग पण दिसत होता. घरात जास्त गरिबी नसली तरी राहणीमान मध्यम वाटत होतं.

अशी बातमी एखाद्या कुटुंबाला देणं खूप अवघड असतं पण पोलिसांना या गोष्टी कराव्या लागतात. पोलिसांनी चौकशीला सुरुवात केली.

शिंदेंनी विचारले, "तुम्हाला काही कल्पना आहे काय हे कोणी केलं असेल?" तेव्हा घरातल्या दोघांनीही नकारार्थी माना डोलावल्या. शिंदेना माहीत होते सरळ वागले की हे असंच होतं त्यांनी दुसरा खोचक असा प्रश्न विचारला, "तुमच्यात काही भांडण वगैरे?"

चंदूच्या बायकोने आपल्यात छोटी मोठी भांडणं होत असल्याचं कबूल केलं. ती रडत रडत म्हणाली, "साहेब भांडणं कोणामध्ये होत नाही, नवरा बायको म्हंटलं कि भांड्याला भांड लागणारच ते.”...

शिंदे पुढे म्हणाले, "पण, तुमच्यात सारखी भांडणं असायची असं आम्हाला समजलं आहे.”

आपल्याला कोठून कळलं हे त्यांनी मुद्दामून सांगितलं नाही.

"तुमचं नाव काय म्हणालात? आणि लग्नाला किती वर्ष झाली?" शिंदेंनी प्रश्न केला...

"साहेब, मी रेश्मा आमच्या लग्नाला जवळ जवळ एक वर्ष होत आलं, पण साहेब यांना कोणी मारल असेल" चंदूच्या बायकोने रडत रडत प्रश्न केला.

बसलेले शिंदे खुर्चीवरून उठता उठता, एका हाताने डोक्यावर टोपी घालत म्हणाले," कळेल लवकरच ! "

दरवाजातून बाहेर पडता पडता शिंदेचं लक्ष दारासमोर लावलेल्या बुलेटकडे गेलं. त्यांनी चंदूच्या वडीलांना विचारले, "ही गाडी तुमचीच का?"... त्यांनी होकारार्थी मान हलवून हो

म्हंटले कारण बोलण्याचं बळ त्यांच्यात उरलेले नव्हते. त्याची अवस्था बघून गरज लागली तर परत येऊ असं सांगून पोलिसांनी काढता पाय घेतला.

गाडी पोलिस स्टेशनच्या दिशेने निघाली.

घड्याळाचा काटे जवळ जवळ चार वाजले असल्याचे सांगत होते. तसं गोळया लागून सरळ सरळ मृत्यू झालेला दिसत होता पण तरीही फोरेन्सिक रीपोर्ट दोन दिवसात आल्यानंतर सगळी खात्री होणार होती. गोळया अशा प्रकारे मारल्या गेल्या होत्या कि साध्या लोकांचे काम वाटत नव्हतं. बरोबर भुवयांच्या मध्ये गोळी लागली होती आणि आजूबाजूला सुद्धा एकही वाया गेलेली किंवा न लागलेली गोळी भेटलेली नव्हती.

शिंदेंना चंदूच्या फॅमिली बदल थोडी माहिती काढायची होती त्यांनी आपल्या खबरींना फोन करून माहिती काढून ठेवायला सांगितली. एका पोस्टमनची हत्या कोण व कशाला करेल?. हे काही केल्या शिंदेंच्या लक्ष्यात येत नव्हतं. यासाठी काहीतरी घरगुती कारण असावं किंवा भांडण तरी...

सकाळपासून जेवणाचा योग आला नव्हता म्हणुन सगळ्यांनी जेवण उरकून घेतलं होतं. शिंदे पाणी पिण्यासाठी बाजूला आले तर त्यांना हवालदार बोबडे आणि काळे काही बोलत असताना दिसले. म्हणून शिंदे सुद्धा थोडं बाजूला त्यांना दिसणार नाही अशा ठिकाणी उभे राहून ऐकु लागले.

नुकतंच जेवण झाल्यामुळे आपल्या भरगच्च मिशांवर हात फिरवून नंतर वाढलेला पोटावर हात फिरवत बोबडे म्हणाले," आज खूपच धावपळ झाली गड्या."... काळेंनी तंबाखूची पुडी बाहेर काढून थोडा तंबाखू तळहातावर घेतला व बोबडेंना सुद्धा दिला. नंतर खिश्यातून चुन्याची डबी बाहेर काढून अंगठ्याच्या नखाने चुना काढून तंबाखूमध्ये मिसळुन मळून ओठात ठेवत काळे म्हणाले, " तंबाखू बरं व्यसन आहे बाबा, स्वस्तात स्वस्त, आपल्यासारख्या लोकांना परवडत बग, नाहीतर '*एवढ्याश्या पगारात*' आपल्याला काय परवडत व्यसन करायला... "

"हो न गड्या, थोडीशी तंबाखू तोंडात गेली की कसं तरतरी येती बग"

"पण आज मला जरा लवकर जायचं होतं, बायकोला डॉक्टरकडे न्यायचे आहे, पण... आजच केस आलीय किती वेळ जातोय काय माहीत "काळे म्हणाले.

शिंदे तेवढ्यात समोर आले व म्हणाले," काळे, मी कधी अडवलंय का तुम्हाला, काही काम असल तर सांगायचं.''... अचानक साहेबांच्या आवाजाने दोघे वळून बघू लागले.

दोघे बोलणार एवढ्यात शिंदे म्हणाले ''जा घरी जा, आपण लोकांची काळजी घेतो ... आपल्या परिवाराची पण घेतली पाहिजे फक्त उद्या लवकर या, जरा काम आहे.'' दोघे तेथून निघून गेले पण एक गोष्ट शिंदेंच्या डोक्यातून जात नव्हती ती म्हणजे एवढ्या, '*एवढ्या कमी पगारात*... '

शिंदेंनी घरी आल्यावर घराचे लॉक उघडले. कालची धूळ अजून तशीच सगळीकडे पसरलेली होती. एखादी केस आली कि जास्त वेळ बाहेरचं राहाव लागत असल्याने घराकडे लक्ष देणं होत नसल्याने घरात अशीच धूळ साठून रहात असे. तसं दोन रूमचे घर. वन रूम किचन. बाहेरच्या रूममध्ये एक बेड होता, बेडच्या बाजूला एक खिडकी होती. दरवाजातून

आत आल्यानंतर उजव्या हाताला एक ब्लॅक अँड व्हाईट टीव्ही होता. टीव्हीच्या बाजूला टेबल वर एक टेबल फॅन पडलेला होता. टेबल वर बाजूला काही जागा रिकामी होती. शिंदेंनी घरात आल्यावर आपली खाकी टोपी, रिव्हॉल्व्हर, आणि बेल्ट टेबलवर ठेऊन दिलं.

घरातील शांतता त्यांना बोचत होती कारण एकाच वर्षापूर्वी त्यांच्या बायकोचा व मुलाचा अपघाताने मृत्यू झाला होता. कदाचित ह्यामुळेच त्यांनी आज काळेंना लवकर घरी पाठवले असावं. आता ते फक्त मातृभूमीची जेव्हढी जमेल तेवढी सेवा करत होते. आपल्याला खुष राहता आलं नसले तरीही दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर आलेलं हसू बघून त्यांना खुप बरं वाटत होतं. स्टोव्हला पिनने टोचून शिंदेंनी स्टोव्ह सुरू केला. स्टोव्हवर चहाचे भांडे ठेवत असताना सुद्धा शिंदेंच्या मनात सकाळच्या केसचाच विचार चालू होता पण काही डोक चालत नव्हत.

एका पोस्टमनचा खून काय होतो!.. का बरं ?... कोणाची दुष्मनी असेल त्याच्यासोबत?

तस जास्त विचार करण्यासारखी केस तरी कुठे उघडली होती. कोणाबद्दल जास्त माहिती पण अजून समजली होती. ह्या

केस म्हणजे धाग्यांचा झालेला गुंतवडा असतो आणि तो सोडायचा असेल तर त्यातल्या धाग्याचं एक तरी टोक सापडायला हव. म्हणजे कसं हळूहळू सगळे धागे मोकळे होतात. आद्रक टाकलेल्या चहाचा घोट घेत घेत शिंदेंच्या मनात असेच विचार चालू होते. एवढ्यात फोन वाजायला लागला. शिंदेंनी फोन उचलून कानाला लावला व पलीकडून आवाज आला, "उद्या आठला ठरलेल्या ठिकाणी." आणि फोन कट झाला...

रात्री झोपताना शिंदे यांच्या डोक्यात एकच गोष्ट होती जी दुपारी काळे नकळत बोलून गेले होते, "*एवढ्या कमी पगारात*"...

## भाग -4

सकाळी आजूबाजूला बरंच उजाडलेले होतं. गार वारा झोंबत होता त्यामुळे आजूबाजूची झाडे मजेत डुलत होती. पूर्वेला असलेल्या झाडांच्या पानांमधून सूर्याची तांबूस किरणे सगळीकडे वाट काढण्याच्या जोमात होती. सूर्याच्या किरणांचे जणू भालेच पृथ्वीवर येत आहेत असा भास प्रत्येकाला होत होता. हे बघून शिंदे थोडे खुष दिसत होते कारण असे दृश्य बघणे त्यांच्या काही दररोजच्या जीवनाचा भाग नव्हता. चाकू आणि पिस्तूल यांचे जग हेच त्यांच्यासाठी बनलेले होतं. नव्हे नव्हे त्यांनीच निवडले होतं कारण कमीत कमी बाकीच्या लोकांना तरी अशा गोष्टीचा लाभ घेता यावा.

शिंदे आज साधाच पोषाख घालून आले होते. कधीकधी ते असा पोषाख करत असत. माणसाला खाकी दिसली कि माणस खोटं बोलायचं सोडा साध बोलत सुद्धा नाहीत. मग अशा प्रकारे उपाय करावे लागतात. हॉटेलमध्ये बसल्यानंतर घड्याळात बघून आपण वेळेवर आलोय याची

खात्री करून त्यांनी एक चहा व कांदा भजीची ऑर्डर दिली. हॉटेलमध्ये बाजूला जुनी हिंदी गाणी चालू होती.

समोरून एक माणूस लंगडत लंगडत येत होता. अंगाने हडकुळा, गाल आत गेलेले, मळकट कपडे, सावळा रंग असा एकूण त्याचा अवतार. समोरून जात असताना त्याने शिंदेंकडे पाहिले. डोळ्याने तिरका बघणारा तो तरुण शिंदेंची खुर्ची व टेबल सोडून पुढे गेला आणि शिंदेंच्या बरोबर मागच्या बाजूला त्यांच्या पाठीला पाठ लागेल असा बसला. त्याचा तो अवतार व डोळे बघून पुढे बसलेल्या दोन तरुणी उठून निघून गेल्या. हळूच खुर्चीवरून मागे झुकून त्याने शिंदे साहेबांना नमस्कार केला तो त्याच्या व शिंदेंच्या सोडून कोणाच्या लक्ष्यात आले नाही.

त्याने सांगायला सुरुवात केली,'' साहेब, मी माहिती काढली, लोक असं म्हणतात.''

एवढ्यात रेडियो वर गाणे सुरू झालं...
कुछ तो लोग कहेंगे
लोगों का काम है कहना
छोड़ो बेकार की बातों में
कहीं बीत ना जाये रैना

कुछ तो लोग कहेंगे

लोगों का काम है कहनाI

गाणे ऐकुन दोघांच्या चेहऱ्यावर हसू आलं, पण कोणाला संशय येऊ नये म्हणून दोघांनी हसू आवरलं. खोकत खोकत शिवाने सांगायला सुरुवात केली...

"साहेब ! त्यांची बायको सोबत खूप भांडण व्हायची असं लोक म्हणतात, मी माहिती काढली.”

"ते तर ठावूक होतं, एवढंच समजलं?"

"साहेब तुम्हाला भांडणाचं कारण नसेल माहीत"

"घरगुती असेल काहीतरी? तसं त्याच्या बायकोने कबूल केलं...”

"आणि बाहेरचं असेल तर?"

"मग मदत होऊ शकेल काही तरी, बोल पटकन”

"साहेब त्याचं बाहेर लफडं होत!"

"अरे पण कसं असू शकत असं आताच तर लग्न झालंय त्याचं आणि गरीब वाटतो बिचारा!"

"त्याच्या बायकोला विचारा हवं तर आणि गरिबीचं बोलायचं झालं तर दारातल्या बुलेटबद्दल काय बोलायचं आहे तुम्हाला.”

इंस्पेक्टर शिंदेंच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला.” 'एवढ्या कमी पगारात' हा शब्द कालपासून आपल्या डोक्यात का येत होता त्याचा अर्थ आज त्यांच्या लक्ष्यात आला. त्यांच्या मते पोस्टमनचा पगार हा हवालदार काळेंपेक्षा कमी होता तरी त्याला परवडत कसं? विचार करायला जास्त वेळ नव्हता चौकीवर जायचे होते. जाता जाता टेबलवर शिवाच्या पाठीवर शाबासकी दिली व काही नोटा खिश्यात टाकून कोणाला समजणार नाही असे गपचूप बाहेर पडले. त्यानंतर शिवा सुद्धा बाहेर पडला पण आता मात्र त्याच्या चालण्यामध्ये असलेला लंगडेपणा आता नाहीसा झालेला तेथे कोणाच्या लक्ष्यातपण आला नव्हता.

पोलिसांना शिवासारख्या लोकांची गरज कायम असतं. गुन्हेगारीला लागलेल्या या पोराला शिंदेंनी एका चांगल्या मार्गाला लावले होते, आता तोच गुन्हेगार पकडायला मदत करत होता. त्याच्या त्या तिरक्या डोळ्याचा त्याने खूप चांगला उपयोग केला होता, जो सामान्य लोकांना जमत नव्हता. तो एखाद्याकडे बघून त्याचं बोलण जरी ऐकत असला तरी पुढच्या माणसाला तो आपल ऐकतोय हे समजत नसायचं हाच त्याचा सकारात्मक गुण इंस्पेक्टर शिंदेंनी ओळखला होता.

ठाण्यात पोचल्यावर सुद्धा शिंदेंना एकच प्रश्न होता,’’एवढा कमी पगार असून सुद्धा चंदू बाकीचे उद्योग करतो कसे?’’ सगळे हवालदार आपापल्या कामामध्ये असताना शिंदेंनी सगळ्याना आपल्या केबिनमध्ये बोलावलं.

शिंदेंची केबिन काही खूप मोठी नव्हती. छोटीशी असून सुद्धा केबिनमध्ये जास्त गडबड दिसत नव्हती.. सगळं व्यवस्थित... टेबल वर कायम फक्त एकच फाइल असायची. एका वेळी ते एकाच केस वर काम करत असत. बाकीच्या फाइल नंबरनुसार मागच्या कपाटात दिसत. शिंदेंच्या खुर्ची समोर दरवाजा होता त्यातून प्रत्येकाला आत व बाहेर करता येत असे. दरवाज्याच्या उजव्या बाजूला एक फळा लावलेला असायचा. त्यामध्ये या महिन्यामध्ये आलेल्या केसेस मांडल्या असायच्या. मर्डर, बलात्कार, चोरी, मारामारी, यांसारखे निरनिराळे गुन्हे त्यावर लिहिलेले असायचे. किती केसेस राहिलेल्या आहेत हे सुद्धा त्यात लिहिलेलं असायचं. त्यात काल एका केसची भर पडली होती.

भाग -5

काळे, बोबडे आणि नाईक तिघे जण दरवाजातून आत आले व एका बाजूला एक असे उभा राहिले. साहेबांना काहीतरी नक्की समजले आहे हे तिघांच्या मगाशीच ध्यानात आले होतं, त्यामुळे थोडा वेळ त्यांनी केबिनबाहेर कुजबुजपण केली होती. आता फक्त आपले म्हणणे खरे झाले म्हणून त्यांनी एकमेकांकडे बघितले.

शिंदे बोलू लागले, "कालपर्यंत मला सुद्धा या केसचं काही लक्ष्यात येत नव्हत पण धाग्याचा गुंता सोडवण्यासाठी एखाद टोक हातात लागाव लागतं, मला ते सापडले आहे.”

"सर! काय बरं ?" नाईक चकित होऊन म्हणाले.

"मला अशी माहिती मिळाली आहे कि चंदूचं बाहेर लफडं आहे...”शिंदे तिघांवरुण नजर फिरवत म्हणाले.

“सर मला असं वाटत नाही... सर मला माझ्या पगारात एक बायको सांभाळता येत नाही! हा दोन कसा सांभाळतो? "हवालदार काळे डोक खाजवत म्हणाले.

"मला ते माहित नाही, पण कदाचित त्यामुळेच त्याचा खून झाला असेल अशी शंका मला येत आहे.. आपल्याला त्याच्या घरी परत एकदा जाऊन आलं पाहिजे." असं म्हणत म्हणत शिंदे खुर्चीमधून उठले.

पोलिसांची गाडी परत चंदूच्या घरासमोर आली. दारासमोर बुलेट अजून तशीच दिसत होती. घरात बरीच गर्दी दिसत होती. घरात पाउल टाकताच पोलिसांनी चंदूचे वडील व बायको सोडून सगळ्याना बाहेर जाण्यास सांगितले.

आपण सरळ विचारले तर कोणी काही सांगणार नाही म्हणून शिंदे यांनी मुद्दाम रेश्माला उलट प्रश्न केला, "तुमचं लफडं होतं म्हणून तुम्ही नवऱ्याला मारल, बरोबर ना?

शिंदेचा प्रश्न ऐकुन रेश्माच्या डोळ्यातील पाणी जागीच थांबले," साहेब हवं तर मामंजीना विचारा पण असं अभद्र बोलू नका."

“मग खरं काय आहे? "

"साहेब आमच्या खानदानातल्या बायकावर नजर करून कधी परपुरुषांकडे बघत नाहीत" पदर डोक्यावर घेत ठामपणे रेश्मा म्हणाली.

"मग?"

"उलट त्यांचंच बाहेर...'' एवढं बोलून रेश्मा शांत झाली.

"बाहेर काय? हे बघा भले तुम्ही त्यांना मारल नसेल पण जे खरं आहे ते सांगा,... म्हणजे कमीत कमी ज्याने त्यांना मारल त्यांना तरी पकडता येईल.''शिंदे समजावण्याच्या सुरात म्हणाले.

"सर! ती चांदनी बारमध्ये नाचते, ती 'सटवी'...''

गाडीमध्ये बसल्यावर शिंदेंना हसूच आलं. नाईक त्यांच्या तोंडाकडे बघून ते का हासत आहेत याचा विचार करत होते पण साहेबांना विचारावे कसं.. शिंदेंनी त्यांच्या तोंडावरचा भाव समजून म्हणाले सांगतो सांगतो. शिंदे म्हणाले काही नाही नाईक दोघांची नाव ऐकुन हसू आलं, "चंदू आणि चांदनी...''

सगळे हसू लागले... रेश्माने ती ज्या बारमध्ये नाचकाम करते त्याचा पत्ता शिंदेंना सांगितला होता.. गाडी आता त्याच ठिकाणी जात होती.

## भाग -6

गाडी एका बारच्या जवळ थांबली. शिंदेंच्या डोक्यात एक युक्ती आली त्यांनी गाडी पुढे जाऊन डावीकडे घ्यायला सांगितली.. मागच्या बाजूला जाऊन काळे व शिंदे यांनी गाडीत ठेवलेला साधे शर्ट घातले. टोपी व बेल्ट काढून ठेवले. फक्त पिस्तूल पँटमध्ये मागच्या बाजूला ठेऊन त्यावर शर्ट सोडला. आणि परत मागे जाऊन बारच्या दिशेने जाऊ लागले. शिंदेंना ठाउक होते पोलिसांच्या वेषात लोक खरं काय ते बोलत नाहीत.. त्यामुळे ते नेहमी एक शर्ट गाडीमध्ये ठेऊन असत.. जाता जाता त्यांनी काळेकडे तंबाखू मागितला.. एरवी ते कधी खात नसत आज काहीतरी वेगळ होणार होतं.

शिंदे बारच्या समोर आले त्यांनी वर बघितले. काळेनी मोडक-तोडक इंग्रजी येत होते. त्यांनी नाव वाचले "पाबलो बार".

शिंदे थोडास हासत म्हणाले "पाबलो इस्कोबार पाहिजे होत जरा चुकले.”

"म्हणजे?" साहेबांच्या डोक्यात काय चालू आहे हे लक्ष्यात न आल्याने काळे म्हणाले.

"काही नाही! कोलंबिया मधला ड्रग्स विकणार एक पात्र होत असं समजा"

"साहेब! मग आज इथे अजून कितीतरी पात्र भेटतील.”

"चला बघुया"

शिंदेंनी काही विचारायच्या आधीच त्यांना बाहेर काढण्यात आलं कारण बार अजून सुरू झालेला नव्हता. परत नंतरसुद्धा याव लागणार असे दोघांच्या लक्ष्यात आलं. आपला खाक्या दाखवून त्यांना पाहिजे ते मिळविता आलं असते पण त्यांनी थोडं शांततेत घेतलं कारण कोणाला सुद्धा चाहूल द्यायची नव्हती.

संध्याकाळी येतांना मात्र सगळे जण जणू काही पार्टीसाठी जायचं आहे असे कपडे घालून आले. सकाळपेक्षा बाहेरचा बोर्ड रात्री जास्त आकर्षक वाटत होता. त्यावर रंगबेरंगी दिवे आणि रोषणाई दिसत होती. आतमध्ये जाण्याच्या

रस्त्यावर सुद्धा दोन्ही बाजूंनी गोलाकार रोषणाई करणारे दिवे थोड्या थोड्या अंतरावर लावलेले होते.

बारच्या आतमध्ये मोठ्या आवाजात गाणी लावलेली होती. डाव्या बाजुला ड्रिंक काऊंटर होतं. तिथे प्रत्येकाच्या गरजेनुसार पेय दिली जात होती. शिंदेंनी अगोदरच सगळयांना हव्या त्या सुचना देऊन ठेवल्या होत्या. आत सुद्धा गाणी व नाचकाम चालूच होतं. आजूबाजूला मद्य पिऊन काही माणसे त्या गाण्यावर आडवी होऊन नाचत होती. बारच्या मधोमध एक गोलाकार स्टेज जमिनीपासून अर्धा फुट वर आलेले होतं. त्यावर काही स्त्रिया हिंदी गाण्यांवर नाच करावा तसा नाच करत होत्या व पिलेल्या लोकांकडून पैसे उकळण्याचे काम ही चालू होतं. शिंदेंनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येकाने आपापल्या जागा घेतल्या. शिंदेना यांच्यामधली चांदणी शोधायची होती...

दारू पिऊन आल्यासारखे शिंदेंनी एकाला विचारले, "भाय! इथ चांदणी कोण हाय यांच्यापैकी?

"तश्या मेकअप वरुण व कपड्यावरून सगळयाच चांदणीसारख्या चमकत आहेत." तो माणूस म्हणाला...

"ह्या बेवड्याला काय विचारतो भाऊ, ती गोरी, चमकता निळा कलर दिसतोय का तीच बघा" दुसरा एक जण दारू तोंडात टाकत म्हणाला.

शिंदेंनी विचार न करता हवेत पिस्तुलाचा आवाज करत पावित्रा घेतला. तसा आजूबाजूचा दंगा कमी झाला. सारे एका बाजूला झाले पण त्या मध्यभागी थांबलेल्या चार जणी फक्त मधी उभ्या होत्या. गोळीचा आवाज येताच बोबडेंनी एकमेव बाहेर जाण्यासाठी लागणारा दरवाजा बंद केला व तेथे उभा राहिले. सगळीकडे सामसूम पसरली. शिंदेंनी चांदणीला पुढे यायला सांगितले व पोलिस स्टेशनमध्ये येण्यास सांगितलं. तिचा अगोदर असलेला अवतार बदलून साध्या कपड्यात येण्यासाठी तिला वेळ देण्यात आला.

मघाशी असलेला तो चेहरा व आपण आता बघत आहोत तो चेहरा वेगळा तर नाही ना असा भास सगळ्यांना होत होता. मेकअप आता नाहीसा झाला होता..

"तर चांदणी मॅडम चंदूला ओळखता का?"

"स स साहेब... क क काय झालं?" प्रश्नाचं उत्तर न देता तिने घाबरत घाबरत प्रतिप्रश्न केला

"ओळखता का? कोण लागतो तुमचा?"

"हो साहेब ! प्रेम करतो तो माझ्यावर"

"त्याच लग्न झालंय!... तो प्रेम करतो आणि तुमचं नाही का प्रेम त्याच्यावर? "

"हो साहेब लग्न झालंय त्याचं... आणि माझं म्हणाल तर जो जो पैसे देतो त्यांच्यावर आम्हाला प्रेम करावं लागतं."

"बरं मग तुम्ही त्याचा खून का केलात?... पैसे कमी भेटले, की त्याला दुसरी चांदणी भेटली..", विषय जास्त न वाढविता शिंदेंनी डायरेक्ट मुद्याला हात घातला.

अचानक ऐकलेल्या बातमीमुळे चांदणीच्या तोंडातून शब्द निघत नव्हते, पण भीतीने अंग मात्र थरथर कापत होतं... शिंदेंनी एका स्त्री कॉन्स्टेबल तिला तुरुंगात टाकायला सांगितले...

## भाग -7

रात्रीची भयाण शांतता पसरली होती. पोलिस स्टेशनमध्ये मोजकेच पोलिस होते. शिंदे साहेब पण उद्या येणार... आता या पोलिसाना कोण सांगणार चंदूला मी नाही मारले. सगळंया बारमध्ये कोणाला जरी विचारलं त्याच्या जास्त जवळ कोण होतं तर कोणी पण माझंच नाव सांगेल. असा विचार चांदणीच्या मनात येत होता.

दुसऱ्या दिवशी शिंदे साहेब आल्या आल्या चांदणीने रडत रडत बोलायला सुरुवात केली, "साहेब! चंदूच लग्न झालेल आहे हे मला माहीत होतं तरी पण तोच माझ्या मागे लागला होता आणि पैशाच्या अडचणीमुळे मी पण त्याला भुरळ पाडली. पण आता सगळं माझ्याच अंगावर येत आहे कदाचित चंदूच्या बायकोने त्याला मारलं असेल व सूड घेण्यासाठी माझं नाव सांगितलं असेल."

"जगातील कुठल्याही बाईला तिच्या नवऱ्याने दुसरीकडे गेलेले चालत नाही; पण ती बाई तशी वाटली नाही... चेहरा बघून माणस ओळखतो आम्ही ", शिंदे म्हणाले.

"साहेब मग तो विक्रम, त्याने मारले असेल त्याला.", चांदणी म्हणाली.

"हे बघा उगाच ह्याच त्याच नाव सांगू बाई... आधी रेश्मा नंतर विक्रम हि काय धर्मशाळा आहे का?", काळे हवालदार मधूनच संतापून म्हणाले. एकतर दोन चार दिवसापासून झालेली धावपळ व सकाळी घरात झालेली भांडणं यामुळे काळेंचा मूड थोडा खराब होता.

शिंदेंना तिच्या बोलण्यात काही तरी खरेपणा वाटला, कमीत कमी काय म्हणणं आहे ते तरी ऐकून घ्यावे म्हणून त्यांनी हात करून काळेना शांत केलं. आणि चांदणीकडे वळून म्हणाले, "का असं तुम्हाला का वाटते? बरं हा विक्रम आहे तरी कोण?"

"साहेब! त्या दिवशी चंदू मला भेटला खुप रागात होता. एक तर मी जिवंत राहील किंवा तो विक्रम तरी असं बडबडत होता. विक्रम हा चंदू ज्या पोस्ट-ऑफिसमध्ये काम करतो तिथेच असतो. एक दोन वेळा त्यांची भांडण पार मारामारीपर्यंत

गेली होती.”असं म्हणत म्हणत… ‘आपण काही केलं नाही’ याचा पाढा मात्र तिने बंद केलेला नव्हता.

आपण जेथून सुरुवात केली तिथेच कदाचित शेवट होणार का? परवाचीच गोष्ट आहे आपण त्या ऑफिसमध्ये जाऊन आलो. पण कोणी काही बोलले पण नाही. अशीच जर लोक करायला लागली तर चोरांना पकडावं तरी कस?.. शिंदेंच्या डोक्यात विचार चालू असताना त्यांनी डोळ्याने इशारा करून नाईक यांना गाडी काढायला लावली. जाता जाता पोलिस स्टेशनमध्ये सुचना देऊन ते तेथून बाहेर पडले.

जि पी ओमध्ये पोचल्यावर परत शांततेचा भंग करण्यासाठी शिंदेंनी विक्रमच नाव काढलं. कोणी पुढे यायला तयार नव्हत. शिंदेंनी एकाची कॉलर पकडून त्याला थोडं धमकावले तसं तो विक्रमकडे बघू लागला. विक्रम हळू हळू गर्दीतून पळून जाऊ लागला. शिंदेंना असे काही तरी होणार याची खात्री होतीच म्हणून त्यांनी नाईक यांना दरवाजावर उभा करून ठेवलेले होतं. नाईक दिसायला दणकट असल्याने मानगुटीला पकडून त्यांनी विक्रमला साहेबांसमोर उभा केला.

दिसायला गोरापान, सिनेमातील हीरो सारखा केसाचा कोंबडा पडलेला, मागच्या बाजूला मानेपर्यंत आलेले केस, आणि डोक्याला वरपर्यंत जाईल असा गंध लावलेला तरुण.. शिंदेंच्या समोर उभा होता. साहेब समोर येताच त्याने नाईकांनी आपली मानगुट सोडावी म्हणून केविलवाणा प्रयत्न करत होता. शिंदेंनी डोळ्याने इशारा करताच नाईकांनी त्याला सोडले. साहेबांनी बाजूला असलेली एक लाकडी खुर्ची ओढून घेतली व त्यावर पाय ठेवून थोडेसे झुकून विक्रमला म्हणाले, "ह्म्म! बोला महाशय का मारलंत चंदूला..”

"साहेब मी काही केलं नाही.. खरंच सांगतो साहेब.” असं म्हणत असताना शिंदेंनी त्याच्या एक कानाखाली लावून दिली. साहेबांकडून असे काही होईल याची अपेक्षा नसताना अचानक झालेल्या हल्ल्याने विक्रम खाली कोसळला...”घ्या ह्याला पोलीस ठाण्यात बघू ह्याच काय करायचं", असं म्हणत शिंदे तेथून बाहेर पडले.

पोलीस ठाण्यात आल्यानंतर आता शिंदेंनी आपला खाक्या दाखवायला सुरुवात केली. कंबरेचा बेल्ट काढून त्यानी बाहेर काढला.” एकदा शेवटच विचारतो तू खून केलास का?”

चेहऱ्यावर राग आणत शिंदे समोर खुर्चीत थरथरणाऱ्या विक्रमला म्हणाले.. नाही म्हणाव तर समोर पडलेला बेल्टनी मार खावा लागेल अशा विचारात विक्रम सांगतो सांगतो असं ओरडू लागला.

एकदाचा काय तो कबूल होईल या आशेने सगळ्यानाच बरं वाटल.. समोर असलेला पाण्याचा ग्लास हातात देत शिंदेंनी विक्रमला काय झालंय ते सांगायला लावल..

पाणी पीत पीत विक्रमने सांगायला सुरुवात केली,''सर तुम्हाला कुठून कळलं माहीत नाही पण त्याच्यात व माझ्यात एक दोनदा वाद झालेला, मारामारी पण झाली होती. पण माझी त्याच्याशी काही दुष्मनी नव्हती..

''चंदू दोन वर्षापूर्वी अचानक कामाला आला. कोणीतरी मोठ्या माणसाने त्याला ओळखीने कामाला लावले असेल. आल्यापासून तो कधी कोणामध्ये सहसा मिसळत नसे. का कुणास ठावूक? आम्ही त्याला कमी वाटत होतो. कधी कधी आम्ही स्वतःहून त्याच्याशी बोलायचो पण तरीही तो आपला लांबच असायचा.. आम्ही कित्येकदा आपल्याकडे आलेल्या पत्रांच्या गप्पा वगैरे करायचो.. सांगायला नको पण

कधी कधी काही पत्रे फुटलेली असली तर आम्ही वाचून परत नीट बसवून ती पाठवून द्यायचो... पण सर आम्ही कधीकधी लोकांना मदत सुद्धा केलेल्या आहेत एक माणुसकी म्हणून...”

"बरं  मग पुढे", शिंदे उत्सुकतेने म्हणाले..

असाच एक दिवस सायकलवर न येता एकदा तो बुलेट घेऊन आला. आम्ही सगळे त्याच्यावर जळू लागलो. साला आम्ही पण त्याच्या एवढंच मरमर मरतो पण एका साहेबाच्या मदतीने काय कामाला लागला ह्याला पगार एवढा कसा?.. आम्ही याबद्दलवर सुद्धा तक्रार केली. पण नंतर त्याला सुद्धा तुमच्या एवढाच पगार आहे... त्याच्या नातेवाईकांनी त्याला लग्नात गाडी दिली आहे असं सांगण्यात आलं.. मग आमचं समाधान झालं कारण मागच्याच वर्षी त्याच लग्न झाले होत असं आम्हाला समजलं. पण काही दिवसांनी सखारामनी त्याला एका दुसऱ्याच मुलीसोबत फिरतांना पाहिले. आम्ही माहिती काढली तेव्हा समजलं कि ती बारमध्ये नाचत होती. त्याच बारमध्ये पण येण जाण होत असे...

"बरं  यामुळे तुम्ही त्याला मारल का?" मागे उभी असलेली चांदणी रागात म्हणाली...

"साहेब! हिच ती...” विक्रम तिच्याकडे बोट धाकवत म्हणाला.

शिंदेंनी डोळयाने चांदणीला बाजूला न्यायला सांगितले.

“साहेब! आम्हाला नंतर सारखं एकच प्रश्न पडायचा हा नक्की करतो काय?. एके दिवशी मी त्यांच्या पत्रांच्या बॅगेमधली काही पत्रे खाली पडलेले पाहिले. मी जवळ जावून उचलले त्याने मला ते उचलताना बघितले. तसा तो धावत आला व मला मागे ढकलून त्याने ती पत्रे हातात घेतली. मला शंका आली, पण मी रागात निघून गेलो.”

“मग तू बघितले नाहीस का त्याच्यात काय होतं?”… त्याच काहीतरी पर्सनल असेल किंवा काही लोकांना नाही आवडत आपल्या कामात लुडबुड केलेली.” शिंदे म्हणाले.

आम्ही त्याच्याशी बोलणे टाळले, पण एक दिवस तो नसताना... का कुणास ठावूक?... माझ्या मनात आले आणि मला त्या पाकिटात काय आहे हे बघण्याची इच्छा झाली. मी त्यांच्या कपटाजवळ गेलो व त्याची पत्रे बघू लागलो एवढ्यात तो परत तेथे आला व मी पुरता अडकलो.. मला काय बोलावे ते सुचेना. त्याचे डोळे लाल झाले तो रागाने माझ्याजवळ आला

व आमच्यात खेचाखेची सुरू झाली. व त्या खेचाखेचीचे नंतर मोठे भांडण झाले. आम्ही एकमेकांना जीवे मारण्याची धमक्या सुद्धा दिल्या. आणि हि घटना सगळ्यांदेखत झाली त्यामुळे सगळ्यानी बघितली सुद्धा...

"बरं मग यामुळे तू त्याला मारले ना" काळे एकदाचा गुन्हा काबूल करावा या उद्देशाने म्हणाले..

"नाही साहेब मी त्याला नाही मारले विक्रम शांतपणे म्हणाला. मी हे एवढ्या करता सांगितले कि तुम्ही माझं ऐकायला सुद्धा तयार नव्हता बेल्ट काढून मारायला लागले होता. कदाचित तुम्ही मी हे केलं नाही हे ऐकुन सुद्धा घेतलं नसत. आणि ज्या वेळी त्याचा खून झाला त्या वेळी मी माझ्या घरी होतो हवं असेल तर माझ्या घरच्यांना विचारा..

टेबलावर जोरात रागाने हात मारत शिंदे रागाने म्हणाले मग खरा खुनी बाहेरच फिरतोय का काय? शिंदेंना विक्रमने खून केला नाही याची खुशी होती पण खरा खुनी अजून सापडला नाही याबद्दल रागही होता.

भाग -8

संध्याकाळी घरात नेहमीचीच शांतता होती. अशा शांततेची शिंदेंना सवय होती. शांतता असली कि बायकोची व मुलाची आठवण त्यांना छळत असे म्हणून त्यांनी टीव्ही लावला व दाढी करायला सुरुवात केली. एरवी दाढी करायला वेळ होताच कुठे त्यांच्याकडे. काम हे असे कधी परत येण होईल याची काही गॅरेंटी नाही. त्यात पोलिस म्हंटल्यावर दाढी वगेरे तर हवीच ना, चेहरा फ्रेश दिसला कि आत्मविश्वास पण झळकतो. त्यांनी तोंडाला फसफस साबण लावला व चुकून सुद्धा मिशीला धक्का लागणार नाही अशा पद्धतीने दाढी करायचं खोरे ते ओढू लागले.

तेवढ्यात दूरदर्शनवर दोन पाकळ्या असलेलं एका बाजूला गोलाकार व दुसऱ्या बाजूला निमुळते टोक असलेला लोगो दिसू लागला. त्याच्यामध्ये असलेल्या गोलामध्ये दूरदर्शन असा शब्द व बाहेर थोड्या मोठ्या आवाजात समाचार

हा डोळयांना सहज दिसावा असा शब्द दिसत होता. शिंदे आपल्याच विचारात असल्यामुळे आवाज कमी होता हे त्यांच्या ध्यानात आले नव्हते. टीव्हीवर चंदूचा फोटो बघून आपल्या केसबद्दल माहिती चालू आहे हे ओळखून त्यांनी टीव्हीच्या जवळ जाऊन उजवीकडून तिसरे बटन दाबून आवाज वाढवला.

"विमानतळावर एका पोस्टमनचा खून आरोपीचा तपास अजून चालू... असं काहीतरी चालू होतं आणि पोलिसांना दोष देण चालू होतं." म्हणून रागाने शिंदेंनी टीव्ही बंद केला..."आम्ही काही करत नाही जसं काही, ठाण्यात नुसत बसून असतो जसं काही,"असा विचार शिंदेंच्या मनात येऊ लागला...

"साहेब मला का धरून ठेवलाय, मी काहीही केलेल नाही. जेवढ होतं तेवढ तर सगळं सांगितलं आहे मी तुम्हाला अजून काय सांगू... तुम्हा लोकांना घरदार नाही म्हणून आम्हाला पण नाही असं नाही ", विक्रम जेलमध्ये संतापाने म्हणाला..

"आम्हाला घरदार नाही, नसले तर नसुदे पण आम्ही इथे दिवसरात्र राबतोय ना म्हणून तुम्ही मोकळा श्वास घेताय "

शिंदे रागाने म्हणाले. त्यांचे डोळे रागाने लाल झाले होते. काहीतरी त्यांच्या मनाला टोचत होतं.

संध्याकाळच्या वेळी शिंदे मॅडीला घेऊन स्वतःच्या घरी गेले. आज त्यांचा मूड खूप खराब होता. येताना आणलेली बीअरची बाटली त्यांनी बाहेर काढली. किचनमध्ये जाऊन दोन काचेचे ग्लास घेतले व मॅडीच्या समोर ते बसले.

मॅडी म्हणजे मदन रावत... शिंदेना जवळपास मागच्याच वर्षी भेटलेला एक मित्र.. वयाने शिंदेंपेक्षा कमी.. दिसायला तरुण, जेमतेम उंची, नजर सूक्ष्म, बुद्धीचा विचार केला तर सामान्य लोकांपेक्षा पुढचा विचार करण्याएवढी तीक्ष्ण. बुद्धी.. मॅडीकडे बघून शिंदेंना कायम वाटत असे अशी लोक आपल्या पोलिससेवेत असली तर खूपच छान होईल.. जेव्हा जेव्हा त्यांना दारू पिण्याची तलंफ येत असे तेव्हा तेव्हा ते मॅडीला बोलावून घेत असत...

थोडासा हसण्याचा आव आणत शिंदे म्हणाले "दारू पिताना काचेचाच ग्लास का घेतात?"

"दारू किती व पाणी किती हे बरोबर समजाव म्हणून असेल कदाचित" मॅडी शेव तोंडात टाकत म्हणाला.

"बरोबर पारदर्शकता असते त्याच्यामध्ये म्हणून... पण अशी पारदर्शकता माणसाच्या नात्याला पण असणे खूप महत्त्वाचे." शिंदेंच्या डोळयातून पाण्याचा एक थेंब बीअरच्या ग्लासमध्ये पडला... त्या थेंबाभोवती असंख्य लहरी उठून लागल्या आणि मधोमध एक चेहरा तरळू लागला... मेघाचा... त्यांच्या पत्नीचा..

उदबत्तीच्या धुराप्रमाणे दारूची नशा वेडीवाकडी त्यांच्या डोक्यात शिरू लागली आणि न बोलावे असे ते बोलू लागले... मॅडी तुला माहित आहे माझी बायको कशी मेली. मॅडीने नकारात्मक मान डोलावली व ग्लास तोंडाला लावला. शिंदे ग्लास खाली ठेवत म्हणाले, "तुला माहित नसेल मागच्या वर्षी आम्ही एका माणसाचा एनकाऊंटर केला होता त्यामुळे त्याचा ड्रग्स व बॉम्बस्फोटचा प्लॅन आम्ही उद्वस्त केला होता.

त्याचा एनकाऊंटर केल्यानंतर मला त्याच्याच एका भावाचा 'नागेश भंडारीचा' फोन आला व मला म्हणाला कि तो तुझा कोणी नव्हता म्हणून त्याला मारलास काय?... आणि तुझ्या स्वतःच्या माणसांचं काय? त्यांना पण असंच शिक्षा देणार काय? मला त्याच्या बोलण्याचा अर्थ समजत नव्हता.

मॅडी तुला माहित आहे आमचा एक नियम मी स्वतः पाळला आहे आणि बाकीच्यांना सगळ्यांना देखील कटाक्षाने पाळायला लावतो. तो म्हणजे आम्ही आपल्या कोणत्याही केसबद्दल घरी बोलत नाही. पण एक दिवस मी संध्याकाळी मी बियरचा घोट घेत असताना मेघाने मला प्रशण विचारला," त्याने मारताना काही सांगितले का?" दोन मिनिटांसाठी मला असे वाटले की मला दारू चढली आहे म्हणून भास झाला की काय?... पण नंतर जेव्हा दुसऱ्यांदा परत प्रश्न विचारला गेला तेव्हा माझ्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. पण चेहऱ्यावर थोडीशीही शंका न दाखवता मी मान नकारार्थी हलवली.

नंतर मी माझ्या माणसांना सांगून माहिती काढली तेव्हा समजले की माझी मेघा, माझी बायको सुद्धा त्या लोकांना सामील आहे. माझ्या पायाखालची जमीन सरकली. आणि त्याने फोनवर बोललेले शब्द माझ्या कानात घुमू लागले. तो तुझा कोणी नव्हता म्हणून त्याला मारलास काय आणि तुझ्या स्वतःच्या माणसांच काय?... आता त्याच्या बोलण्याचा अर्थ मला समजू लागला होता.. मी मनाशी ठरवले मेघाला सुद्धा माफी नाही तिलासुद्धा शिक्षा भोगावी लागेल. जेव्हा मी तिला पकडण्यासाठी निघालो. घरी जाऊन बघतो तर मेघा व माझा

तीन वर्षाचा मुलगा घरात नव्हते. बातमी अजून मी कोणाला सांगितली नव्हती तिला डायरेक्ट पोलिस ठाण्यात नेऊन अटक करायचे असा माझा विचार होता. पण कदाचित मी पोहोचण्याच्या आधीच तिला मी तिच्या मागावर आहे हे समजले होते. ती माझ्या हातातून निसटली.

तिला निघून जास्त वेळ झाला नव्हता कारण शेजारच्यांनी तिला मी यायच्या पंधरा मिनिटे आधी माझी कार घेऊन बाहेर पडताना बघितले होतं.. तिचा मोबाइल नंबर ट्रेस करून मला तिचे लोकेशन समजलं. मी तिचा पाठलाग करून तिच्या जवळ जवळ पोहचत होतोच, पण तिला ही सुद्धा बातमी भेटली. आणि माझ्या हाती लागु नये म्हणुन तिने गाडीचा स्पीड वाढवला आणि माझ्या डोळ्यासमोर एका ट्रकला ती भरधाव गाडी जाऊन आदळली. मोठा स्फोट झाला आणि मेघा व माझा मुलगा त्यामधे ठार झाला..

मेघाबद्दल मला काही वाटले नाही कारण कायदा तिला शिक्षा देणार होते पण त्या बारक्या जिवाचा काय दोष होता... माझ्या अजूनही लक्ष्यात आलं नाही...

त्यानंतर मिळालेले पुरावे व मुळ आरोपी मारला गेल्यामुळे केस समाप्त तर झाली. मेघाला शिक्षा तर झाली होती

त्यामुळे केसची गुंतागुंत न वाढवता तो अपघात होता असा त्या गोष्टीचा शेवट होता.. एवढं करूनसुद्धा सगळ्यांना असं वाटत आम्हाला फॅमिली नाही या लोकांना काय कळणार आहे माझं दुःख. हे न्यूजवाले सारखे बोलतात पोलिसांच्या हाती काही लागले नाही ह्यांना काय माहीत आहे, मॅडी.. चार दिवस झाले डोळ्याला साधी झोप नाही.. चार दिवस काय एक वर्षापासून माझं मन मला खातंय जगाला चांगल्या मार्गाने वागा असे सांगणारा मी... माझ्या घरात तरी हे पाळल गेलं आहे काय?...”

शेवटचा घोट घेताना शिंदे म्हणाले, " मॅडी एक गोष्ट सांगतो माझा स्वार्थ म्हणून मी माझ्या बायकोचा गुन्हा लपवून ठेवला नाही पण त्यानंतर सुद्धा माझ्यावर शिंतोडे उडवायला लोकांनी कमी केलं नसते आणि मला बाकीच्या लोकांची सेवा माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत करायची आहे. मला हे सुद्धा माहित आहे.. मला केंव्हातरी एखादी गोळी लागून मरण येईल… हो आणि मला ते मरण मंजूर असेल, कारण ते मी माझ्या देशासाठी दिलेल बलिदान असेल. एवढा वाक्य बोलतच त्यांचा तोल गेला आणि ते जमिनीवर कोसळले. मॅडीनी जास्त घेतली नव्हती कारण घरी परत जायचे होतं पण साहेबांची ही अवस्था बघून त्यांने तिथेच थांबायचे ठरवले.

साहेबांना त्याने उचलून बेडवर झोपवले. आणि स्वतः खाली झोपला.

मॅडीला आज शिंदे साहेबांचं एक वेगळ रूप बघायला मिळालं होतं.

भाग -9

सकाळी उन्हाच्या कोवळया किरणांनी खिडकीतून आत प्रवेश केल्यानंतर दोघांना जाग आली. डोक्यात अजून कालचा विचार आलंटून पालटून येत होते. व दारूमुळे होणारी डोकेदुखी चालूच होती.. तेवढयात शिंदेचा फोन वाजला... फोनवर विमानतळावरचा तो मोठा अधिकारी बोलत होता. , "साहेब तुम्ही कॅमेरा लावायला सांगितला त्याप्रमाणे आम्ही कॅमेरा लावला होता पण काल रात्री इथे काही हालचाली झालेल्या दिसल्या.”... थोड्याच वेळामध्ये पोहोचतो असे सांगून शिंदेंनी फोन ठेवला.

शिंदेंच्या सांगण्याप्रमाणे नाईक गाडी घेऊन खाली तयार होते. गाडी काही वेळामधेच विमानतळावर पोहोचली. साहेब व सगळे हवालदार कंट्रोलरूमच्या दिशेने निघाले. त्या अधिकाऱ्याने कॅमेऱ्यात कैद झालेला प्रकार सगळयांना दाखवला. त्यात तीन जण तोंडाला मास्क लाऊन काहीतरी शोधत होते. मास्कमुळे त्यांचा चेहरा बघणे शक्य नव्हतं.

जवळजवळ एक तास शोधाशोध करून सुद्धा त्यांच्या हाताला काही लागले नव्हतं. निराश होऊन तिघे जाताना गाडीमधे चढले आणि गाडी निघून गेली. शिंदेंनी गाडीचा नंबर झूम करायला लावला. चोरांनी त्यावर कपडा टाकून नंबर लपवण्याचा शहाणपणा केला आहे हे सगळ्यांच्या ध्यानात आले. नाईक नकारार्थी मान हलवत साहेबांकडे बघू लागले. शिंदे त्याच्या पाटीवर हात ठेवत त्यांना म्हणाले, "नाईक गुन्हेगार कितीही हुशार असला तरी काहीतरी चूक करतो.. तुमच्या लक्ष्यात आलं नसेल पण मला जे हवं आहे ते भेटलय."

सगळे साहेबांच्या चेहऱ्याकडे कुतूहलाने बघू लागले, "कारण एक म्हणजे त्या व्हीडीओ मध्ये एक तर त्यांचा चेहरा दिसत नव्हता व गाडीचा नंबर सुद्धा दिसत नव्हता! "

"हो हो सांगतो, जरा धीर धरा" शिंदे म्हणाले व पुढे बोलू लागले," आपल्याला चेहरा दिसत नसला तरी ते इथे आलेत आणि जाताना ही काही न सापडता गेलेत हे तरी साफ दिसतंय यावरून एक गोष्ट निश्चित सांगता येईल की ते काही तरी शोधायला आले आहेत आणि ते त्यांना मिळालेले नाही. आणि कदाचित विक्रमने सांगितलंय त्याप्रमाणे ते त्या पाकिटात काही तरी शोधत असावेत.. आणि ज्या अर्थी ते

त्यांना सापडलेले नाही त्याअर्थी ते चंदूच्या पोलीस स्टेशनमध्ये जमा केलेल्या त्या सामानामध्ये असावं असा माझा अंदाज आहे.

आणि दुसरी गोष्ट म्हणजे शिंदेंनी कॉम्प्युटर स्क्रीनकडे बोट दाखवले व म्हणाले, "गाडीचा नंबर नाही म्हणून काय झालं, गाडीची कंपनी, रंग व हा मागच्या बाजूला असलेला स्टीकर बघा कदाचित हा सुद्धा आपल्याला त्यांच्यापर्यंत पोचवू शकतो."...

त्या स्टिकरची एक प्रिंट काढून ती आपल्या सोबत घेऊन ते सगळे परत पोलीस स्टेशनमध्ये जाण्यासाठी निघाले. ठाण्यात जाऊन एका गोष्टीचा उलगडा त्यांना करायचा होता.. जाताना शिंदेंनी परत गडबड झाली तर कळवा असे त्या अधिकाऱ्याला सांगितले. आणि सेफ्टीसाठी आपल्या जवळचे दोन पोलिस सुद्धा पाठवून दिले.. अर्थात त्याची गरज नव्हती कारण तिकडे त्या अधिकाऱ्याने विमानतळावर असलेली काही ऑफिसर तैनात करतो असे शिंदेंच्या कानावर घातले होते. पण शिंदेंना आता कोणत्याच गोष्टी मध्ये रिस्क घ्यायची नव्हती अगोदरच केसला हवं तसं यश येत नव्हते आणि त्यात अजून झालेल्या चुका त्यांना परवडणार नव्हते…

शिंदेंनी त्यांच्या माणसांना गाडीचा शोध घ्यायला सांगितला. शिंदे आता मोबाईल घेऊन नवीन नंबर डायल करू लागले. नाईक गाडी चालवता चालवता सर आता कोणाला फोन लावणार आहेत या उद्देशातून बघू लागले. शिंदेंचा फोन पलीकडून उचलला गेल्यावर पुढून बोलणाऱ्याला बोलण्याचा वेळ न देताच शिंदेंनी लवकरात लवकर स्टेशनला येण्यास सांगितले. साहेबांना प्रत्येक गोष्ट कशी विचारायची त्यापेक्षा कोणाला बोलवले आहे हे प्रत्यक्ष बघू असा विचार करत करत नाईकांनी गाडीचे स्टेअरिंग डाव्या बाजुला वळवून डावे वळण घेतले.

पोलिस स्टेशनमध्ये पोचल्यावर साहेबांनी बोबडे हवालदाराना चंदूचे जमा केलेल सामान आणायला सांगितले.

तेवढ्यात साहेब आत येऊ का? असा आवाज आला तसे सगळे वळून दरवाजाकडे बघू लागले. शिंदेंच्या केबिनमध्ये प्रवेश केल्यावर तो युवक खाली खुर्चीवर बसला. आणि नंतर शिंदेंना विचारले, "साहेब बसू का?"...

शिंदे त्या व्यक्तिकडे बघत म्हणाले, "मॅडी बसला आहेस आता तू आता विचारायची गरज नाही, तुला माहीत आहे मी तुला इकडे कशासाठी बोलावले आहे.”...

मॅडी हासत म्हणाला, "हो हो माहीत आहे,.. आणि एक गोष्ट लक्ष्यात ठेवा तुम्ही माझे मित्र आहात म्हणून मी तुम्हाला मदत करत नाही गुन्हेगारांना पकडून देऊन तुम्ही जे काही कार्य करताय त्याला माझा हातभार लावावा म्हणून ही माझी मदत समजा हवं तर..”

तेवढ्यात बोबडे सर्व जमा केलेल साहित्य घेऊन आले. शिंदेंनी आता पर्यंतची केस मॅडीला समजावुन सांगितली. कारण मॅडीची पण त्यांना गरज लागणार होती..

केस समजून घेतल्यानंतर चंदूच्या सामानाकडे सगळ्यांनी आपले लक्ष वळवलं. बोबडेंनी हातातली बॅग टेबलवर ठेवली. आणि बॅगच्या आतील समान बाहेर काढलं. मॅडी व इन्स्पेक्टर शिंदेंनी सगळंया पत्रांचे लिफाफे फाडून आतील चिठ्या बाहेर काढल्या व त्यात काही पुरावा सापडतो का हे चेक केलं, पण त्यात काही सापडल नाही. मॅडीने ती बॅग आपल्याकडे घेतली व बाकीचे कप्पे चेक करायला सुरुवात केली. त्यात त्याला एक पांढरी चिठ्ठी सापडली. त्यावरचा

मजकूर वाचण्याचा प्रयत्न मॅडी करू लागला. पण मजकुरात काय लिहिले आहे हे त्याला सुद्धा वाचता येईना.

शिंदेंनी चिठ्ठी आपल्या हातात घेतली व मजकूर बघितला. चिठ्ठीत मजकूर वाचून नेमकं काय सांगायचंय त्याचा उलघडा होत नव्हता '4IEVLELRAP5 ' असा त्या चिठ्ठी मध्ये मजकूर होता. जेमतेम 9 इंग्रजी अक्षर आणि दोन अंक.

शिंदेंनी मॅडीला त्या चिठ्ठीकडे बोट दाखवत खुणावले,'घ्या आता ही कुठली भाषा म्हणायची, मॅडी " शिंदे म्हणाले.

"साहेब मला असं वाटत नाही ही कोणती वेगळी भाषा आहे"

"पण मग अर्थ काय याचा?"

"साहेब, माझ्या माहितीप्रमाणे तरी ही मला कोणती भाषा वाटत नाही , मी इंग्रजी, मराठी व्यतिरिक्त बऱ्याच भाषा जाणतो पण मला खात्री आहे की ही वेगळी कोणतीच भाषा नसावी.”

"मग पुढे काय?"

साहेब कदाचित मला असं वाटतंय हा एखादा कोड वैगेरे आहे, एखाद्या स्थळाच नाव वैगेरे, किंवा काहीही असू

शकत, अगदी काहीही... मला तुम्ही थोडा वेळ द्या मी तुम्हाला हे नेमकं काय आहे हे सांगतो.”

"हो वेळ घे पण ऐक गोष्ट लक्षात ठेव… मॅडी …आपल्याकडे जास्त वेळ नाही, सो बी क्विक.”

ट्रिंग... ट्रिंग... इन्स्पेक्टर शिंदेंचा फोन वाजू लागला. फोन उचलून शिंदेंनी कानाला लावताच पलीकडून आवाज आला," साहेब ती गाडी सापडली ज्याचा तुम्ही शोध घ्यायला लावला होता.”

शिंदे म्हणाले," तुला खात्री आहे ना, मी तुला जो फोटो पाठवला होता तोच आहे आणि गाडीचा रंग व बाकी सर्व सगळं बरोबर आहे.”

पलीकडून फोनवर आवाज आला," हो साहेब तीच गाडी आहे तुम्ही लवकरात लवकर या, ते सर्व एका गॅरेजमध्ये गेले आहेत, मी त्यांच्या मागेच राहील, मी तुम्हाला पत्ता पाठवतो तेथे आल्यावर तुम्हाला सर्व लक्षात येईल.”

"बरं त्या गॅरेजच नाव काय आहे "

"मकदूम ॲटो गॅरेज" आणि पलीकडून फोन कट झाला.

भाग -10

शिंदेंनी हातातल्या घड्याळाकडे बघितलं तर संध्याकाळचे आठ वाजले होते. आपले कपडे बदलून साध्या वेशात सगळे निघाले. नाईकांना विमानतळावर थांबायला लावले असल्याने आता त्यांना बाईक घेऊन जावे लागणार होतं. काळे व बोबडे सुद्धा साध्या वेशात त्यांच्या पाठोपाठ निघाले. पोलिस ठाण्यातून रात्रीच्या सुमारास दोन दुचाकी बाहेर पडल्या...

"साहेब तुमचं नेटवर्क मात्र जबरदस्त आहे बरं का"? मॅडी म्हणाला.

"मॅडी, ते आम्हाला ठेवावंच लागतं नाहीतर अशा तळागाळातल्या बातम्या कशा काढायच्या, आणि ही पोरं पर सरकारला नकळत मदत करत असतातच की, नाहीतर ही पण वाईट मार्गाला लागतील." शिंदे म्हणाले.

गाडी फोनवर आलेल्या पत्यावर पोहोचली. शिंदेंनी आपल्या हातातलं एक पिस्तूल मॅडीला दिलं," गरज पडली तरच चालवावं पण फक्त तुझ्या संरक्षणासाठीच कारण कदाचित येथे चकमक होऊ शकते, मागून दोघेजण आपल्याला कवर फायर देतीलच.”

पण जेव्हा ते त्या गॅरेजवर पोहोचलो तेव्हा तेथे सगळीकडे शांतताच होती. कोठे कोणत्याच प्रकारची गडबड होत नव्हती. कदाचित सगळे सावध झाले असावे असे समजून सगळ्यांनी भिंतीच्या आडोश्याला जागा पकडली. शिंदेंनी मगाशी आलेल्या फोनवर फोन लावला पण त्यांच्या खबरीकडून फोन उचलला गेला नाही, कदाचित त्याला पकडले की काय असा प्रश्न त्यांच्या डोक्यात आला.

"या बंटीला किती वेळा सांगितलं तरी ऐकायचं नाही, पुढे गेला असेल धाडस करायला" आणि आपण नकळत त्यांचं नाव घेतलं हे त्यांच्या लक्ष्यात आले. बाकी कोणाचे शिंदेंनी घेतलेल्या नावाकडे लक्ष नव्हते. शिंदेंनी मॅडीकडे बघितले तेव्हा तो फक्त गालातल्या गालात हसला.

फोन लागत नाही हे पाहताच सगळे सावध झाले व गॅरेजच्या शटरजवळ आले. शटर बाहेरून बंद आहे याची जाणीव सर्वांना झाली. मागच्या बाजूने गॅरेजमध्ये जाण्यासाठी एक दरवाजा असल्याचे शोधाशोध केल्यानंतर सर्वांच्या लक्षात आले. गॅरेजचा मागचा दरवाजा जास्त मजबूत नव्हता, हवालदारांनी धक्का मारून दरवाजा तोडला. आत आल्यानंतर सगळीकडे काळोख पसरलेला असल्यामुळे काहीच दिसत नव्हते. काळेंना समोर एक विजेचा स्वीच दिसताच त्यांनी सर्व बटने दाबून बल्ब लागतो का हे बघायला सुरुवात केली. कदाचित योग्य ते बटन दाबले गेले असेल, रूममध्ये वस्तू दृष्टीस पडू लागल्या.

गॅरेजमध्ये वस्तू इतरत्र पडलेल्या होत्या. मोठमोठाली टायरे, ट्यूबा व खालच्या फरशीवर ठिकठिकाणी ऑईल पडून सर्वत्र घाण झाली होती. वाट काढत काढत कोणी आत नाहीना याचा कानोसा घेत सर्व मोकळ्या जागेत आले. मधोमध नऊ बाय आठची मोकळी जागा होती. मधोमध एकावर एक मोठाले तीन टायर ठेऊन त्यावर एक प्लायवूड टाकून टेबल तयार केलेला होता. टेबलवर बिर्याणीची पार्सल खाऊन इकडे तिकडे घाण पसरलेली होती आणि त्याचा दुर्गंध सगळीकडे पसरलेला

होता. दारूचे तीन ग्लास पडलेले होते. मधोमध दोन बाटल्या पडलेल्या दिसत होत्या. बाजूला बसावयास घेतलेल्या खुर्च्या व टेबल विखुरलेले दिसत होते.

समोर पडलेल्या पसाऱ्यावरून नजर फिरवत व आपल्या तोंडाला रुमाल धरत शिंदे म्हणाले," चला एवढं तरी लक्षात आलं हे कदाचित तीन जण आहेत.”

"साहेब! चुकताय तुम्ही मला असं वाटतंय चार जन आहेत," मॅडी म्हणाला.

"मॅडी,मित्रा सोप आहे समोर तीन ग्लास दिसतात तीन जण असतील" शिंदे आपल म्हणणं बरोबर असल्याच्या विश्वासात म्हणाले.

"साहेब पण त्यांनी खाऊन टाकलेल्या चिकनच्या घाणीवरून तर मला असं वाटतंय की ते चार जण होते. आणि तुम्ही म्हणल्याप्रमाणे दारूच्या गलासच्या म्हणायचं झालं तर कदाचित त्यांच्यामधल्या एखादा कदाचित पीत सुद्धा नसेल" मॅडी सगळ्यांकडे पाठ करत काही तरी विचार करत म्हणाला.

तेवढ्यात फोन परत वाजू लागला. शिंदेंनी फोन कानाला लावताच पलीकडून बंटीचा आवाज आला," साहेब,…मी पाठवतोय त्या पत्यावर लवकर या.”

"अरे पण तू ठीक आहेस काय?" शिंदे म्हणाले.'' आणि किती लोक आहेत तिकडे.''

"हो हो साहेब! मी ठीक आहे. तुम्ही यायच्या आधी ते तिथून निघाले त्यामुळे मी सुद्धा त्यांच्या मागे निघालो. एकूण चार लोक आहेत. तुम्ही लवकरात लवकर येण्याचा प्रयत्न करा येथून ते सुटले तर परत कदाचित लवकर हातात येणार नाहीत.'' बंटी पलीकडून म्हणाला आणि फोन कट झाला.

''चला चला घाई करा... लवकरात लवकर पोहचायला हवं...''

या वेळी गाडी मॅडीकडे चालवायला देवून शिंदे मागे बसले. त्यांनी मागे बसून नाईकांना फोन लावला. व विमानतळावरून लगेच पाठवलेल्या पत्यावर यायला सांगितले. फोन ठेवल्यानंतर शिंदेंनी मॅडीच्या खांद्यावर हात मारत म्हणाले," शाब्बास तुझा अंदाज एकदम बरोबर निघाला, मॅडी..''

मॅडी गाडीचा स्पीड वाढवत म्हणाला," साहेब एक सांगू का चारच काय घेऊन बसलात साहेब, ती दहा जण किंवा त्यापेक्षा जास्त असेल तरी आता आपण त्यांना सोडायचं नाही, पण आपण वेळेत पोचायला हवं.''

गाडी पंचवीस मिनिटातच बंटीने पाठवलेल्या पत्त्यावर पोहोचली. तेवढ्यात बंटी धावत शिंदेंच्या शेजारी आला.'' साहेब बरं झालं वेळेत आलात. मी त्यांच्या गाडीच्या सगळ्या टायरांची हवा काढून ठेवली आहे.'' बंटी म्हणाला

शिंदेंनी त्याच्या पाठीवर हात ठेवून बाकीच्यांना सावधपणे मागे येण्यास सांगितले. समोर गाडी थांबलेली होती. गाडीच्या पलीकडे एक फार्महाऊस होतं. आजूबाजूला गडद हिरव्या रंगाची झाडी पसरलेली होती. पण अंधारामुळे त्यांचा रंग जाऊन काळी छटा सगळीकडे पसरली होती. त्या फार्महाऊसच्या मागे जंगल होतं. जाण्यासाठी जी वाट होती तेथील वाट आता पूर्णपणे पोलिसांच्या ताब्यात होती. कोणालाही चाहूल लागणार नाही अशा पावित्र्यात पोलिसांची तुकडी त्या फार्महाऊसच्या दिशेने जायला निघाली.

दरवाजाची बेल बाहेरून वाजताच आतील चार जण सावध झाले. खिडक्यांचे पडदे आतून बंद करण्यात आले. आणि प्रत्येका ने आपापल्या गन हातात घेऊन जागा घेतल्या. बाकीचे जागेवर बसले आहेत याची जाणीव होताच एकाने गन आपल्या मागच्या बाजूला लपवून दरवाज्याच्या दिशेने

जाण्यास सुरुवात केली. आपला अवतार ठिकठाक करत आपली झोपमोड झाली आहे असा अभिनय करत त्याने दरवाजा उघडला.

समोर एक माणूस उभा होता. आपली गाडी बंद पडली आहे. एखादा मॅकेनिक भेटेल का असा तो विचारात होता. दरवाजा उघडलेल्या माणसाने नाही असे सांगत दरवाजा बंद करायचा प्रयत्न करू लागला, तेवढ्यात बाहेरून दरवाजा थोडासा ढकलला गेला. त्याने काय हवंय असं विचारताच पुढचा माणूस एक ग्लास पाणी भेटल का? असे विचारू लागला. याला नाही कसं म्हणाव?... म्हणून तो पाणी आणण्यासाठी गेला. जाताना बाकीच्यांना सावध रहा असा इशारा करायला तो विसरला नाही.

तो माणूस पाणी आणायला गेला हे बघताच डायरेक्ट आत न जाता शिंदे आजूबाजूच्या परिस्थितीचा कानोसा घेऊ लागले. त्यांना काही तरी गडबड वाटू लागली. त्यांनी दरवाज्याच्या चौकटीवर हात ठेवून त्यांनी दोन्ही बाजूला उभा राहिलेल्या आपल्या माणसांना शांत राहण्यासाठी इशारा केला.

प्रत्यक्ष आत मध्ये हल्ला करू नये असे शिंदेंच्या मनात आले कारण आतील लोक सावध आहेत आणि ते गुन्हेगार

नेमके कुठे लपले आहेत यांचा अंदाज अजून त्यांना आला नव्हता. तेवढयात नाईक तेथे आपल्या दोन हवालदार साथीदारांसोबत येऊन पोहोचले. काळेंनी त्यांना इशाऱ्याने लांबूनच पोझिशन घेण्यास सांगितले. कारण 5 मिनिटांच्या अगोदरच शिंदेंनी त्यांना प्रत्येक गोष्ट समजून सांगितली होती. कमीत कमी एकाला तरी जिवंत पकडायचा असा त्याचा मास्टर प्लॅन ठरला होता नाईकांनी व बाकीच्यांनी आपापल्या पोझिशन घेतल्या.

## भाग -11

थोड्याच वेळात पाणी आणायला गेलेला माणूस किचनमधून बाहेर येत असल्याची जाणीव शिंदेंना झाली. आता त्यांच्याकडे मोजून एक मिनिटांच्या वेळ आहे हे शिंदेंच्या लक्षात आले होतं. कारण एकदा दरवाजा बंद झाल्यावर परत दरवाजा वाजवणे म्हणजे आतल्या लोकांचा संशय खरा करून दाखवणे होय.

पुढून येणारा माणूस जवळ येताच दारूचा वास आल्याने शिंदेंना तो मगाशी गॅरेजमधून आलेल्यापैकी आहे याची खात्री झाली होती आणि दुसरी गोष्ट म्हणजे विमानतळावर आलेल्या कॅमेऱ्यात कैद झालेली गाडी सुद्धा बाहेर होती, एवढा पुरावा त्यांना त्यांच्यावर हल्ला करायला खूप होता. त्याच्या हातातून पाण्याचा ग्लास हातात घेऊन तो पिण्यासाठी तोंडाला लावता लावता शिंदेंनी त्यातील पाणी जोरात त्याच्या तोंडावर फेकले व हाताची मुठ जोरात त्यांच्या नाकावर मारली.

अचानक झालेल्या हल्यामुळे त्याने डोळे मिटले आणि गन घेण्यासाठी हात मागे घेऊ लागला. परिस्थितीचा फायदा घेऊन शिंदेंनी गन खाली पाडून पायाने आपल्या डावीकडे असलेल्या आपल्या माणसाकडे टाकली. व त्या माणसाला सुद्धा अजून दोन तीन ठोसे टाकून आपल्या माणसाकडे लोटलं.

तेवढ्यात पुढून हालचालींना सुरुवात झाली. अंधाराचा फायदा घेऊन लपलेल्या तीन जणांनी आपल्या माणसावर झालेल्या हमल्यामुळे बेधुंद गोळीबार करायला सुरुवात केली. शिंदेंना अंधारातून येणारा गोळीबार सहसा लक्षात न आल्यामुळे त्यांना उजव्या बाजूला दरवाज्याचा आधार घेऊन गोळया झाडायला सुरवात केली. दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू झाला. अचानक पलीकडून एक गोळी शिंदेंच्या डाव्या हातावर लागली. रक्ताची चिळकांडी उडाली. शिंदेंनी सुद्धा पुढच्या एका माणसाला अचूक हेरून त्याच्या छातीत दोन गोळया घातल्या. जागच्या जागीच तो गतप्राण झाला. त्याला गोळी लागलेली बघून बाकीच्या दोघांनी तोंडाला रुमाल बांधून मागच्या दरवाजातून जंगलाच्या दिशेने पळ काढला.

फायरींग करत करत शिंदेंनी घरात प्रवेश केला. व अजून दोन गोळया त्या पडलेल्या व्यक्तीला घातल्या. थोडीशी

प्राणज्योत असलेल्या त्या देहाने जमिनीपासून दोनदा थोडी उसळी घेऊन आपला प्राण सोडला. तेवढ्यात बाकीचे मागच्या दरवाजाच्या दिशेने पाठलागासाठी पळाले. पण एव्हाना ते दोघे तेथून फरार झाले होते. पुढे काळ्याकुट्ट अंधार पसरला होता. वेळही तशी नऊ दहाची झाली होती. त्यामुळे त्यांचा पिछा करणे व्यर्थ होता. म्हणून आणि लोकांच्या प्राणाचा धोका घ्यायला नको या विचारांनी शिंदेंनी माघार घेतली. नंतर घराची तलाशी घेतली गेली. मृत्युमुखी पडलेल्या माणसाच्या गन व बाकीच्या वस्तू एका पिशवीत भरून ताब्यात घेण्यात आल्या. व त्या पकडलेल्या माणसाला शिंदेंच्या समोर आणण्यात आलं.

रूम प्रकाशित करण्यात आली. शिंदेंनी त्याला काय भानगड आहे विचारले. तो सांगायला तयार होईना. तसे शिंदे भडकले त्या मेलेल्या माणसाकडे बोट दाखवत म्हणाले "आज इथे एक नाही दोन एन्काऊंटर झालेत हे सिद्ध करायला मला काही कष्ट पडणार नाहीत, तसापण मला असं वाटतंय तू चेला असणार... मेन लोक तुला टाकून पळून गेलेत"... तरीही समोरून काहीही प्रतिक्रिया येत नाही हे पाहून आपल्या गोळी

लागलेल्या हाताकडे नजर टाकत शिंदेंनी अजून दोन ठोसे त्याच्या तोंडावर मारले.

त्याचा जबडा आता पूर्णपणे तोडला होता. आता बंदूक काढून आपल्याला ज्या ठिकाणी गोळी लागलेली आहे त्याच ठिकाणी बरोबर बंदूक ठेवून शेवटचा प्रश्न त्यांनी केला, "बोलणार आहेस का?"

पुढून परत नकारार्थी मान हालली गेलेली कारण तोंडातून शब्द काढायला शिंदेंनी त्याचा जबडा जागेवरून सरकून टाकला होता. शिंदेंनी क्षणाचाही विलंब न करता त्यांच्या डाव्या हातावर थोड्या लांब जावून बंदुकीची गोळी झाडली. तोंड दाबून एखाद्याला मार बसावा असा त्यांचा आवाज ऐकून आजुबाजुचे सारेच शांत झाले व घाबरले. तेवढयात शिंदेंनी त्याच्या पायावर पिस्तुल ठेवली.

तेवढ्यात मॅडी मध्ये येऊन म्हणाला," साहेब प्लीज अजून आपल्याला हवी ती माहिती भेटलेली नाही आणि एकाला तरी जिवंत पकडायचा होता आपल्याला रागाच्या भरात कृपया करून गोळी चालवू नका."

शिंदेंनी पिस्तुल खाली करत सारे जमा केलेली सामान व दोन आरोपींना घेऊन जायला सांगितलं. जाताना आरोपींना घेऊन हॉस्पिटलमध्ये एकाला अडमिट व दुसऱ्याच्या बॉडीला पोस्टमार्टमला पाठवायला सांगितलं. आणि दोन जणांना तिथे जिवंत आरोपीच्या शेजारी पहाऱ्यांवर ठेवायला सांगितलं.

गाडीवरून शिंदे व मॅडी सुद्धा हॉस्पिटलला गेले कारण हातातील गोळी वेळेत काढून टाकने गरजेचे होतं. गोळीपासून बाधा होऊ नये म्हणून गोळी काढून टाकून व डॉक्टरकडून इलाज करून घेऊन शिंदे मॅडीसह आपल्या घरी आले शिंदे मॅडीला म्हणाले," मॅडी, कृपया करून एक दोन दिवस मला अजून तरी तुझी गरज लागेल कारण मला कदाचित गाडी सुद्धा चालवता येणार नाही.''

"साहेब, मी पण तुम्हाला हेच सांगणार होतो मी दोन दिवस इथेच राहील. तुम्हाला सुद्धा थोडीफार माझी मदत होईल.''

घरी आल्यावर शिंदेंनी फ्रेश होऊन बेडवर अंग टाकलं, पण झोप काही लागत नव्हती. नजर फिरवून त्यांनी मॅडीकडे बघितलं तर मॅडी खिडकीतून बाहेर आकाशात बघत काही तरी विचार करत होता. शिंदेंनी जागेवरून हलायचा प्रयत्न

करण्यासाठी अंग हलवलं तेवढ्यात मॅडीचे लक्ष त्यांच्याकडे गेलं.

"साहेब तुम्ही आराम करा, लगेच उठायची काही गरज नाही, तसेही आता रात्रीचे साडे अकरा झाले आहेत.''मॅडी म्हणाला.

"पण तू जागा का? तुला झोप येत नाही का?" शिंदे म्हणाले.

"साहेब, खूप दिवसांतून मला खूप बरं वाटतंय जणू माझं स्वप्नच पूर्ण झालंय असं मला वाटतंय"

"कसलं स्वप्न मला गोळी लागलेलं बघायचं काय?" शिंदे हासत हासत म्हणाले.

"काय साहेब? काय अभद्र बोलताय तुम्ही स्वप्नातसुद्धा तुमच्याबद्दल माझ्या मनात असा विचार येणार नाही..'' मॅडी म्हणाला.

"मग बोलतोस काय? की घालू तुला एक गोळी त्या आरोपीला घातली तशी "शिंदे हासत म्हणाले.

मॅडीने खिडकीतून पुन्हा खिडकीतून बाहेर आकाशाकडे बघत बोलायला सुरुवात केली," साहेब तुम्हाला आठवतंय आपण भेटून कमीत कमी एक वर्ष पण झालं नसेल,

पण तुम्हाला माझ्याबद्दल काहीच माहित नाही अजून.” शिंदेंनी हा पुढे काय सांगतोय याचा विचार करत नकारार्थी मान हलवली. तोंडातून आवाज न काढता हातातून होणाऱ्या वेदनांची कळ सोसत त्यांनी मॅडीकडे बघितलं.

मॅडी बोलू लागला... ," साहेब मी मूळचा सातारा या गावचा.. आमच्या साताऱ्यात मूल लहानपणापासून देशसेवेची स्वप्नं बघायला सुरुवात करतात. फक्त मुलेच नाही तर घरातल्या प्रत्येकाची अशी अपेक्षा असते कि घरटी एक तरी माणूस सैन्यात असावा.. माझं पण असंच स्वप्नं होत. पण उंचीच्या अभावी मला आधी सैन्यातून व नंतर पोलिस भरतीमधून रिजेक्ट केलं. माझ्या स्वप्नाचा चक्काचूर झाला होता. माझे मानसिक मनोबल पूर्णपणे खचले व मी कामासाठी दुसरा पर्याय निवडावा म्हणून मी मुंबईला आलो आणि एका चाळीत राहू लागलो.”

“कुठेतरी जॉब शोधावा व पोलिसांत जाण्याचा नाद सोडावा असा विचार करून मी कामाच्या शोधात लागलो. पण अचानक काही दिवसांनी आमच्या रुमवर पोलिस आले. ज्या गोष्टीपासून लांब जाण्याचा मी प्रयत्न करत होतो ती गोष्ट मला सोडायला काही तयार नव्हती. हा फरक येवढाच होता या वेळी

पोलिस मला आरोपी म्हणून घेऊन जाण्यासाठी आले होते. नंतर मला समजले की चाळीतील मुलांनी गुन्हे, मारामाऱ्या केल्या व पोलिस आल्यानंतर फक्त त्यांच्या सहवासात असल्यामुळे मला पोलिसांकडून मार खावा लागला.”

“पोलिसात जाण्याच स्वप्नं तर सोडाच पण पोलिस स्टेशनमध्ये जाण्याचा योग माझ्या वाट्याला आला. त्या दिवशी मी ठरवले की काहीही करून आपल्यावरचा हा कलंक आपण धुऊन टाकायचा. माझं स्वप्नं, माझ्या घरच्यांच्या माझ्याबद्दल असणाऱ्या अपेक्षा एक दिवस मी नक्की पूर्ण करणार आणि आज मला तुमच्या सोबत काम करायची संधी मिळाली. पण मी तुम्हाला खात्री सरशी सांगतो मी माझ्या आयुष्यात एकही असे काम केलेले नाही ज्यामुळे तुम्हाला व माझ्या कुटुंबातील लोकांना माझ्यामुळे आपली मान खाली घालावी लागेल.” आणि मॅडी परत शांत झाला.

"म्हणजे माझ्याशी ओळख करणे हा तुझा स्वार्थ होता तर" शिंदेंनी हासत हासत प्रश्न केला.”

"साहेब असेलही तो माझा स्वार्थ, पण तो स्वार्थ वैयक्तिक नव्हता.. देशाची सेवा करून मला माझ्यावर लागलेला डाग पण पुसायचा होता... आणि पोलिसात जाण्याचे

माझे स्वप्न काही आताचे नाही लहानपणापासूनचे आहे." मॅडीने उत्तर दिले.

पण मॅडीचे लक्ष काही आपल्या बोलण्याकडे नाही हे शिंदेंच्या लक्ष्यात आले. शिंदेंनी खांद्यावर ठेवलेल्या हाताने मॅडीला हलवत आणि आवाज देत त्याला भानावर आणले.

त्याची कहाणी ऐकता ऐकता शिंदे उठून त्याच्या मागे उभे राहिले होते. त्याच्या खांद्यावर हात ठेऊन ते म्हणाले, माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे, मॅडी.."

"साहेब मी एका गोष्टीचा विचार करत होतो. आपण त्या आरोपीला पकडले हे खरे पण आपण फक्त त्याच्यावर अवलंबून न राहता त्या चिठ्ठीमध्ये काय आहे याचा विचार करायला हवा, आणि जसं की मी आपल्याकडून वेळ मागितली होती त्याप्रमाणे मी एक गोष्ट शोधून काढली." मॅडी म्हणाला व त्याने आपल्या हातातील कालची चिठ्ठी शिंदेंच्या समोर केली.

"4IVELELRAP5 "साहेब मला असं वाटतंय ही दुसरी कुठली भाषा नसून इंग्रजीच आहे, आणि अंकाचे बघायला गेल तर ते फक्त क्रम दर्शविण्यासाठी असावेत, " मॅडी म्हणाला.

"म्हणजे नेमकं काय म्हणायचे आहे तुला "शिंदे चिठ्ठी हातात घेऊन विचार करत बोलू लागले.

"साहेब मला असं म्हणायचं आहे की एकूण 9 इंग्रजी अक्षरे आहेत आणि अंकांची बेरीज पण नऊ तर इथे दिल्याप्रमाणे आपण डावीकडून 4 व उजवीकडून 5 अशी नऊ अक्षरे वेगळी केली की दोन इंग्रजी शब्द बनतात ते म्हणजे (IEVL व ELRAP) "

भाग -12

"पण यातून तर काहीच उघड होत नाहीये, मॅडी, कदाचित यांचे क्रम आपल्याला बरोबर लावायला हवेत " शिंदे म्हणाले.

“अगदी माझ्या मनातलं बोललात साहेब तुम्ही मी सुध्दा ह्यावरच विचार करत होतो, दोन्ही बाजूच्या अक्षराचे क्रम बदलून मधोमध घेतले तर पहिला शब्द VILE (विले) असा होतो तर दुसरा शब्द नक्कीच PARLE (पार्ले) असा असावा कारण त्यात सर्व अक्षरे उपलब्ध आहेत. " 'विलेपार्ले' येथे नक्कीच काहीतरी घडणार असेल तुम्हाला काय वाटते.

" शक्यता नाकारता येत नाही", शिंदेंनी उत्तर दिले. "

"साहेब माझ्या मनात तर वेगळाच संशय येतोय", "गाडीतून येताना मी त्या आरोपींला हा कागद दाखवून काही लक्षात येतेय का हे विचारले, त्याला बाकीच्या कागदावरून व ह्या शेवटच्या कागदावरून कदाचित पूर्ण पत्ता समजला असेल असे वाटते ", मॅडी शिंदेकडे वळून म्हणाला.

"याचा अर्थ असा आहे की आपण आता चुकीच्या ठिकाणी थांबलो आहोत आपल्याला तिथेच थांबायला हवे होते ", शिंदेंनी शंका व्यक्त केली,

”आपल्याला लवकरच तेथे गेले पाहिजे, त्याच्या साथीदारांना समजलं तर ते लगेच तेथे जाण्याचा प्रयत्न करतील आणि आपल्याला अजून त्यांचे चेहेरे सुद्धा नीट माहित नाहीत,”

“साहेब ,आपण ताबडतोब निघायला हवे असा वेळ वाया नको घालवायला, मॅडी सरांना म्हणाला. घरातून निघताना शिंदे यांनी पेनकिलरच्या गोळया व आपले पिस्तूल आणि इतर गोष्टी सोबत घेतल्या.

इकडे पळून गेलेल्या दोन्ही आरोपींनी हॉस्पिटलमध्ये त्या जखमी आरोपीला कुठे ठेवले असेल हे माहीत करून घेतले होतं. सामान्य माणसाचे पोषाख घालून आपल्याला कोणी ओळखणार नाही अशा अवस्थेत ते हॉस्पिटलमध्ये आले होते.

तेव्हा दारावर त्यांना दोन पोलीस उभे दिसले. ते दोघे जण जोपर्यंत तेथे उभे आहेत तोपर्यंत त्यांना तेथे जाणे अशक्य आहे हे दोघांनाही लक्षात आलं. त्यामधे एकाला युक्ती सुचली एकाने खाली मारामारी चालू असे सांगून खालच्या मजल्यावर

न्यायचे आणि दुसऱ्याने स्टाफ मेंबरचा पोषाख घालून आत जायचं व आपले काम करायचं.

ठरवल्याप्रमाणे एकजण एका पोलिसाला खाली घेऊन गेला व दुसरा चेकिंगच्या बहाण्याने आत गेला आणि जाताना आत कोणालाच पाठवू नका असे त्याने हवालदाराला बजावले, आत जाऊन एकूणच परिस्थितीचा आढावा घेतल्यावर त्याच्या लक्षात आले की हा माणुस खूपच जखमी झाला आहे, पण शुद्धीत आहे व आपल्याशी काहीतरी बोलायचा प्रयत्न करत आहे, पण तुटलेल्या जबड्यामुळे त्याला ते शक्य होत नाहिये पण त्याला काहीतरी सांगायचं आहे. कदाचित त्या शेवटच्या मजकूराबद्दल असावे.

पण आता काय करावे? असा विचार करत असताना त्याला समोरच्या टेबलवर पेन आणि काही कागद दिसले, कदाचित गोळ्यां लिहून देण्यासाठी ते कागद वापरले जात असावेत. त्याने तो कागद आणि पेन त्या पेशंटच्या हातात दिला व त्याला त्यावर इशाऱ्याने लिहायला सांगितलं. त्या जबडा तुटलेल्या माणसाने कागदावर काहीतरी लिहून तो कागद असलेला पॅड दुसऱ्या माणसाच्या हातात सोपवला. त्याने काय लिहिलं आहे हे जाणून घेतल्यानंतर त्याला खात्री झाली की

आपल्याला जे हवे होते ते मिळालं, त्याने त्या पेशंटकडे एक कटाक्ष टाकला व त्याला लक्षात आलं की ह्याला हॉस्पिटलमधुन बाहेर काढणे अशक्य आहे, उलट हा माणुस आपल्यासाठी धोकादायक ठरणार आहे, आणि तसंही आपलं काम झाले आहे त्यामुळे आपण इथून लगेच बाहेर पडणं आता जास्त महत्त्वाचे आहे असा विचार त्याच्या मनात आला.

हातातल्या कागदावरचा पत्ता त्याने काळजीपूर्वक वाचला आणि लगेचच तो कागद त्याने लायटरने जाळून टाकला व शेजारच्या डस्टबिनमध्ये तो कचरा टाकला. आपल्या खिशातून इंजेक्शन काढून त्याने ते लगेच त्याच्या सलाइनमध्ये ते सोडून त्याला डोळ्याने खूण करून तो म्हणाला, "आता तू शांत झोप.”

तोंडाचा मास्क न काढतच त्याने रूमच्या बाहेर येताच बाहेर उभा असलेल्या हवालदाराला सगळे व्यवस्थित असल्याचा सांगून तो पुढे जाण्यास निघाला. तो चालत असताना मागून दोन जण धावत येत असल्याची जाणीव झाली. मागून येणारी कदाचित पोलीस असणार जी त्या दिवशी आपल्यावर गोळीबार करत होती. आता आपण केलेला प्रकार

थोड्याच वेळात त्यांच्या लक्ष्यात येईल त्याआधी आपण आपल्या खाली असलेल्या मित्राला घेऊन येथून पळून गेलेल बरं असा विचार त्या व्यक्तीच्या मनात आला आणि त्याने घाई घाईने पावले टाकायला सुरुवात केली.

मागून शिंदे व मॅडी पळत येत होते. समोर एक हवालदार कमी असल्याचे पाहून त्यांना आपली शंका खरी असल्याची जाणीव झाली. शिंदेंनी जवळ येताच दुसऱ्या हवालदाराला त्याबद्दल विचारलं. त्या हवालदाराने खाली काही तरी प्रॉब्लेम झाला असल्याने तो खाली गेला असल्याचे त्यांना सांगितलं.

एवढ्यात मॅडीने ऑपरेशनरूममध्ये प्रवेश केला. शिंदेंनी समोर असलेल्या हवालदाराला दुसऱ्या हवालदाराला व त्या माणसाला वर घेऊन येण्यास सांगितलं. त्या हवालदाराला सूचना देत असताना आतून मॅडीने दिलेला' साहेब' असा आवाज शिंदेंच्या कानावर पडला.

दरवाजातून आत आल्यानंतर मॅडीचा उतरलेला चेहरा बघून शिंदेना एकंदर परिस्थिती लक्षात यायला वेळ लागला नाही. शिंदेंनी कार्डियाक मॉनिटरकडे आपली नजर फिरवली.

कार्डियाक मॉनिटरमध्ये दिसणारा ग्राफ आता सरळ रेषेत दिसू लागला होता.

आपल्याला यायला उशीर झाला आहे हे त्यांच्या चेहऱ्यावर सुद्धा जाणवू लागले. समोर बेडवर असलेला आरोपी जिवंत नाही याची खात्री दोघांनीही झाली. संशयास्पद अशी एकच गोष्ट तिथे दिसत होती ती म्हणजे आरोपीच्या हातात पेन दिसत होतं. कदाचित मरायच्या आधी त्याने काहीतरी लिहिण्याचा प्रयत्न केला आहे हे कोणाच्याही लक्ष्यात येण्यासारखे होतं.

मॅडीने काळजीपूर्वक आजूबाजूला शोधाशोध करायला सुरुवात केली. शिंदे साहेबांच्या बुटाखाली कागदाचे काही तुकडे जळलेल्या अवस्थेत त्याच्या नजरेस पडले.. शिंदेंना सुद्धा एकंदरीत काय घडले याचा अंदाज आलाच होता, वेळ न दवडता त्यांनी डस्टबिन(कचऱ्याच्या डब्याकडे ) जाऊन शंकेचे निरसन केलं.

## भाग -13

तेथे त्यांना कागदाचे जळालेले अवशेष दिसले. त्यातील जळालेल्या कागदावर ‘PARLE’ असा शब्द अर्धवट जळलेला असताना सुद्धा त्यांना दिसला. ‘PARLE’ हा शब्द बघून आपण मघाशी लावलेला अंदाज बरोबर असल्याचे व तो या गुन्हेगाराला सुद्धा समजल्याचे शिंदेंच्या लक्ष्यात आलं. त्यांनी तो तुकडा मॅडीच्या हातात देऊन आपली चिंता व्यक्त केली आणि आपल्याला मिळायच्या आधी आरोपीच्या हाती तो पत्ता लागला असल्याचे मॅडीला सांगितलं. आता पूर्णपणे उशीर झालेला आहे असं शिंदेंच्या चेहऱ्यावर दिसू लागले होतं. तेवढ्यात...

"साहेब मला असं वाटतंय मी तुम्हाला तो पत्ता सांगू शकेल!" मॅडी म्हणाला.

शिंदेंनी आश्चर्यचकित होऊन मॅडीकडे बघितले व म्हणाले, "कस काय? तो तर जळून गेलाय आता आणि तो पत्ता ज्याला माहित होता तो सुद्धा...”

"साहेब एक पेन्सिल भेटली तर बघा" मॅडीने शिंदेंना सांगितले.. थोड्याच अंतरावर त्यांच्यापासून थोडे मागे उभ्या असलेल्या नर्सकडून एक पेन्सिल घेऊन शिंदेंनी ती मॅडीच्या हातात दिली. मॅडी पेन्सिल घेऊन त्याच्याकडे बघू लागला.

इकडे आरोपीला समोर आपला मित्र हवालदाराला कसा वेड्यात काढतोय हे बघून हसू आवरत नव्हतं. त्याने जवळ जाऊन तुम्हाला साहेबांनी वर बोलावलंय असे सांगून आपल्या साथीदाराला घेऊन तेथून पळ काढला. खाली असलेला हवालदार जेव्हा शोधायला आलेल्या हवालदाराला भेटला तेव्हा आपल्या नकळत नक्कीच काहीतरी गडबड झालेली आहे हे दोघांच्या लक्ष्यात आलं. दोघेही वर जायला निघाले.

समोर रूममधून वाकून आत बघणाऱ्याला नर्सेसकडे बघून काहीतरी विचित्र घडलेले आहे आणि आता साहेबांचा राग सहन करावा लागणार या विचाराने त्यांना घाम फुटला. दरवाजातून लोकांना बाजूला करून त्या दोघांनी रूममध्ये प्रवेश केला तेव्हा शिंदे साहेब व त्यांचा मित्र समोर उभे होते. त्यांचा मित्र हातात पेन्सिल घेऊन काहीतरी विचार करत होता...

मॅडी विचार करता करता समोर खाली ठेवलेले तो पॅड वर उचलला. पेन्सिल थोडीशी तिरपी करून त्याने त्या पॅडवरील वरच्या पानावर आडवी अलगद फिरवायला सुरुवात केली. त्यासरशी त्यावर अक्षरे उमटू लागली. आणि अगोदर त्या पेशंटने जो मजकूर लिहिला होता तोच आता त्या खालच्या पानावर उमटू लागला. थोड्या वेळातच सर्व मजकूर दिसू लागल्यावर त्याने तो कागद शिंदेंच्या समोर धरला. शिंदेंनी मजकूर वाचल्यानंतर त्याने ते दोन आरोपी आता कोठे गेले असतील याची जाणीव झाली. शिंदेंनी फोन लावून आपल्या लोकांना त्या ठिकाणी येण्यासाठी काही सूचना दिल्या.

हॉस्पिटल मधल्या दोन हवालदारांकडे रागाने बघत शिंदेंनी आपल्या मागे येण्यासाठी सांगितलं. मॅडीसुद्धा शिंदेंच्या मागोमाग हॉस्पिटलच्या रूममधून बाहेर निघाला.

काही वेळात गाडी ‘VILE PARLE’ च्या त्या फार्म हाऊसच्या समोर थांबली, ज्या ठिकाणचा पत्ता त्या कागदावर लिहिलेला होता.

फार्म हाऊसवर आधीच पोहोचलेल्या त्या आरोपींना समोर ज्यासाठी आपण एवढा खटाटोप केला त्या वस्तू दिसत

होत्या. अचानक दरवाजा धक्का मारून फोडला गेल्यामुळे त्यांनी घाबरून मागे बघितले तर पोलिसांचा वेढा संपूर्ण फार्म हाऊसवर पडला होता. एका आरोपीने बंदूक काढण्यासाठी हालचाल केली तर तेवढ्यात पुढून आलेल्या एका गोळीने त्याच्या मस्तकाचा वेध घेतला. आता फक्त एकजनच मागे उरला होता. त्याने कोणतीही हालचाल न करता हातवर करून शरणागती पत्कारली त्याला ताब्यात घेण्यात आलं.

शिंदेंनी पुढे जाऊन बंद बॉक्स उघडले तर आत मध्ये ड्रग्सची पाकिटे दिसली. खुप मोठ्या प्रमाणात साठा पोलिसांच्या हातात लागला होता. शिंदेंनी त्याला या मागचा मास्टर माईन्ड कोण असल्याचे विचारले. त्याने हासत हासत नागेश भंडारी नाव सांगितलं.. शिंदेंना हे नाव परिचयाचे होतं. थोडा वेळ शिंदेना विश्वास बसत नव्हता.

शिंदेंनी मागे वळून त्या आरोपीला त्याचे नाव विचारले त्याने ‘नागेश भंडारी’ असे स्वतःचे नाव सांगितलं.

मॅडी थोडा विचारात पडला की हे नाव आपण कोठे तरी ऐकले आहे. त्याने साहेबांच्या चेहऱ्याकडे बघितल्यावर मॅडीचा लक्षात आलं की साहेबांनी ज्या आरोपीचा एन्काऊंटर केला होता त्याच्या ज्या भावाचा फोन शिंदे साहेबांना आला

होता. त्याचे नाव सुद्धा नागेश भंडारी असेच तर नव्हतं ना? असा विचार मॅडीच्या मनात असताना शिंदेंनी त्या माणसाच्या श्रीमुखात लगावून दिली व म्हणाले," अच्छा तर ही सगळी तुझी करामत आहे तर, मला वाटल तर तो विषय तिथेच संपला असेल?"

"मी एवढ्या लवकर हार मानेल असं तुला वाटलाच कस!' भंडारी म्हणाला.

"तसपण यापुढे तुला वेगळ काही करण्याच्या लायकीचा मी ठेवणार कुठे आहे,भावाचा एन्काऊंटर विसरलास वाटत " शिंदे म्हणाले ,’’याला खाली बसवा. मला काही गोष्टी जाणून घ्यायच्या आहेत. ’’

शिंदेंनी सुद्धा एक खुर्ची घेऊन त्याच्यासमोर ती ठेवली व बोलायला सुरुवात केली.’’बरं बोला आता, बॉम्बस्फोट करणारे तुम्ही हे चिंधी चाळे केव्हापासून करायला लागतात" शिंदे म्हणाले," की पोलिसांच्या भीतीने?"

"पोलिसांची भीती तेव्हा ही नव्हती व पुढे ही नसणार आहे... मी पोलिस स्टेशनला पोहोचायच्या आत तुला फोन येईल व तू स्वतः मला सोडायला येशील" भंडारी हासत हासत म्हणाला.

मॅडी व आजुबाजुचे सर्व हवालदार व पोलिस कर्मचारी पुढे काय चालू आहे याकडे लक्ष घेऊन ऐकत होते.

भंडारीने पुन्हा बोलायला सुरुवात केली. खुर्ची सरकवून त्याने आपला एक पाय दुसऱ्या पायावर ठेवला व तो बोलू लागला, " हे ड्रग्स पूर्ण मुंबईमध्ये पसरवले जाणार त्यातून जो नफा होतो तो इतका असतो त्यात तुमच्या सारखे कित्येक पोलिस असे विकत घेतो येतील, अगदी तू सुद्धा."

"पण याचा आणि त्या बॉम्बचा काय संबंध" शिंदे म्हणाले.

"आता हे पण आम्हीच सांगायचं का तुम्हाला."

मॅडी एक पाऊल पुढे येऊन म्हणाला," साहेब मी बोलू का?

शिंदेंनी मान हलवून त्याला परवानगी दिली...

भाग -14

ड्रग्सच्या पैशातून ते बॉंबसाठी लागणारी सामग्री वेगवेगळ्या ठिकाणांहून मागवत असतील. यामुळे कोणाला एकतर संशय येणार नाही आणि दुसरं म्हणजे मुंबईमध्ये ड्रग्सचं जाळंसुद्धा पसरवता येतं.”

भंडारी हासत हासत म्हणाला, "तुम्ही लोकांनी आता सगळ्या गोष्टी अवघड करून टाकल्या आहेत. सगळीकडे चौक्या व पहारे, विमानतळावरून पण काही पाठवायचे म्हंटले तर माल पकडला जातोच.”

"मग ही चिठ्ठी, ही पत्रे ह्यांची काय भानगड?... आणि त्या चंदूला मारण्याचे नेमके कारण काय?" शिंदेंनी भंडारीची कॉलर पकडत विचारले..

"लांबून बोला, हात उचलण्याचे काम नाही, आणि सगळं मीच सांगायचं तर तुमचं काम काय ह्यात "भंडारी शिंदेंच्या डोळ्यात डोळे घालून गुरगुरत म्हणाला.

मॅडीने मध्ये येत साहेबांना डोळ्याने इशारा करत करत मागे नेले व बोलायला सुरुवात केली केली, "मला असं वाटतंय कि फोन टॅप होण्याची भीती असेल. एकदा का फोन टॅप झाला कि त्यातली माहिती डिकोड करायला पोलिसांना काही अवघड नाही, हे ही लोक जाणून असतील.''

"हो आणि माहिती तर मिळेलच जर कनेक्शन लावला तर फोन कोठून आला हे ही समजतं आणि ह्यांच्या कितीतरी गोष्टी आपल्या हाती लागतात.'' शिंदे म्हणाले..

शिंदे म्हणाले," तरीही एक प्रश्न राहतोच चंदूनी काय केलं होत त्याला का मारण्यात आलं? "

"माज माज होता त्याला खूप, त्याला आम्ही नाही त्याला त्याच्या कर्मानी मारलंय. कोण विचारत होत त्याला दोन वर्षांपूर्वी? मी त्याला नोकरी दिली, पैसा दिला... एवढा पैसा भेटत होता पण त्याला हाव... माझ्याशीच गद्दारी करायला निघाला.''भंडारी म्हणाला.

"म्हणजे नेमकं काय केलं त्याने?" शिंदे म्हणाले.

"आम्हाला पत्ता एकाच पत्रातून कधीच येत नसे. चार किंवा त्यापेक्षा जास्त पत्रांचा वापर केला जात असे. त्यामुळे सगळी पत्रे मिळाल्याशिवाय आम्हाला पूर्ण व अचूक पत्ता

भेटत नसे आणि हि पत्रे यायची पहिली वेळ नव्हती या आधी सुद्धा बऱ्याच वेळा अशा प्रकारे पत्रे आलेली होती "भंडारी म्हणाला.

"मग" शिंदेची उत्सुकता आता शिगेला पोहोचली होती.

"पत्रे विमानतळावरून पोस्ट ऑफिसपर्यंत यायच्या आत तो त्यातील चिठ्या काढून घेत असे आणि आम्हाला देत असे. मागच्या काही वेळा त्याने चिठ्या मिसिंग आहेत हे सांगितले व परस्पर चिठ्या वाचून माल गायब केला आणि तो माल तो त्याच्या प्रेयसीच्या साहाय्याने त्याने बारमध्ये विकायचा आणि पैसे कमवायचा.. असं करून त्याने माझ्याशी पंगा घेतला.''आणि मी त्याचा काटा काढला.

"कितीही प्रयत्न केला तरी तू हातात सापडलासच ना!" काळे खूप वेळ शांत होते आता त्याची कॉलर पकडून बोलू लागले.

"फक्त थोडा वेळ धीर धरा, स्वताच मला सोडायला येचाल "भंडारी हासत हासत म्हणाला..

शिंदे विचार करण्यात गुंतले होते. आपोआप त्याच्या हाताने गनलोड केली गेली आणि चालता चालता त्यांची

पावले थांबली गेली. शिंदे मागे वळले तसे भंडारीच्या चेहऱ्यावरचे हसू नाहीसे झालं. अचानक घामाचा एक थेंब त्याच्या केसांमधून घरंगळून खाली आला. शिंदेंच्या गनमधून गोळी सुटली आणि भंडारीच्या मस्तकात तिने प्रवेश करताच तो खाली कोसळला. सर्व माल सरकारी खजिन्यात जमा करण्यात आला आणि दोन्हीही आरोपींचे मृतदेह फार्महाऊसच्या बाहेर नेण्यात आलं…

मॅडी मनात असलेल्या शंका तोंडावर न येऊ देता तो शांत उभा राहिला. सगळे गेल्यानंतर साहेबांनी मॅडीला मदत केल्याबद्दल आभार मानले व मला पुढे सुद्धा तुझी गरज भासत राहील तेव्हा तुला हवं असेल तर तू मदत करू शकतो असे सांगितलं. मॅडीने सुद्धा त्यांना जेव्हा जेव्हा मदत लागेल तेव्हा तेव्हा मदतीला येण्याचे आश्वासन दिलं.

शिंदे मॅडीला म्हणाले, "तुझ्या मनात एक गोष्ट राहून राहून येत असेल याला आपण कायद्याने शिक्षा का नाही केली आपण एनकाऊंटरमधेच का मारला याला?"

मॅडीच्या मनातली गोष्टच साहेबांनी त्याला विचारल्यामुळे त्याने गोंधळून फक्त चेहऱ्यावर आश्चर्य व्यक्त करत मान हलवली.

"ह्याला कायद्याने शिक्षा करण्यात आपला व सरकारचा वेळ वाया जाणार आणि यांच्यासारख्या आरोपीवर आपलं सरकार खर्च करणार... शेवटी काय होणार केस कोर्टात जाणार त्याच्यात पाच किंवा दहा वर्ष जाणार आणि नंतर याचा कोणीतरी गॉडफादर येऊन त्याला सोडवून नेणार... यापेक्षा आपणच बदल घडवून आणला तर काय बिघडलं... कमीत कमी याच्यामूळे भविष्यात जाणाऱ्या लोकांची तरी प्राण वाचल्याचे समाधान भेटेल."

मॅडीला साहेबांचे म्हणणे आता पटले होतं. पोलीस तरी आता किती दिवस कायद्याच्या कक्षेत राहून गुन्हेगारांशी लढा देणार तेही अशा मोकाट सुटलेल्या आरोपीशी जे लोक कशाचीही तमा बाळगत नाहीत. आपली सिस्टम जोपर्यंत बदल घडवून आणत नाही, कठोर शासन करत नाही, तोपर्यंत गुन्हेगारी संपणार तरी कशी?...

"साहेब पण एवढं करून सुद्धा एक गोष्ट राहतेच." मॅडी म्हणाला...

याच्या शंका काही केल्या कमी कशा होत नाहीत त्याचा विचार करत शिंदे साहेब हासत हासत म्हणाले, "बोला, काय राहिले आता?"

"साहेब ती चांदनी बारडान्सर, तीच काय? तिने सुद्धा गुन्हा केलाय किंवा असं म्हणता येईल कि गुन्ह्यांमध्ये साथ दिलीय मग तिचा सुद्धा एनकाऊंटर केला जाईल काय?"

"नाही! मला तरी तिच्यापासून कोणाला धोका आहे असे वाटत नाही. हा तिने परिस्थितीमूळे वाईट कामात साथ दिली असेल पण त्याची तिला कायद्याच्या चौकटीत राहून शिक्षा जरूर भेटेल आणि तिला ती भोगावीच लागेल.’’शिंदे म्हणाले.

जाता जाता शिंदे मॅडीला म्हणाले, ‘‘आज आपण एक केस पूर्णपणे संपुष्टात आणली म्हणायची 'रहस्यभेदच' झाला म्हणायचा, एका गोष्टीच्या मागे मागे धावत धावत दुसऱ्याच गोष्टीच्या तळाशी आपण पोहोचलो आणि आधीच्याही एका केसचा आपण उलगडा केला.’’

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

